# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १४/१२/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक १४/१२/२००४ रोजी सभा सुचना क्र. २० दि. १०/१२/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ९) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १०) | श्री. मिलन गो. पाटील | सदस्य |
| ११) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| १२) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**रजेचे अर्ज आलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११६ चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतोय. मागच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये आरोग्य विषयक चर्चा होऊन उपायुक्त साहेबांनी आरोग्याबद्दलचे अहवालाचे जे रिमार्कस् सांगितले आणि त्या अनुषंगाने सर्व सदस्यांनी सभापती महोदयांकडे मागणी केली आणि हा विषय स्पेशल अजेन्डावर घेऊन त्या बाबतीत निर्णय होण्याबाबत आग्रह धरला आणि सर्व सदस्यांच्या आग्रहानुसार सभापती महोदयांनी हा विषय अजेन्डावर घेतलेला आहे. त्याबद्दल सर्व सदस्यांच्या वतीने प्रथम सभापती महोदयांचे अभिनंदन करुन धन्यवाद देतो आणि अशी सुचना मांडतो की, हा जो विषय या येथे विषयपत्रिकेवर घेतलेला आहे, प्रकरण क्र. ११६ संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान अंतर्गत सफाईबाबत, आरोग्याबाबत आलेल्या अहवालावर चर्चा करणे. तर साहेब, अजेन्डाच्या विषयावर मी थोडासा बदल सुचवितो की, चर्चा करुन निर्णय घेणे असे आपण त्याच्यात समाविष्ट केले तर त्याला थोडेसे ग्रेस येईल.

**मा. सभापती :-**

मान्य आहे.

**अशोक पाटील :-**

सचिव साहेब, तशी नोंद घ्यावी. या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे. धन्यवाद.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आम्हांला त्या अहवालाच्या प्रती पाहिजेत.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ११६ मध्ये जो आपला अहवाल आला आहे त्याची माहिती सचिव साहेबांनी वाचून दाखवावी.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मागच्या सभेत चर्चेत आपले असे ठरले होते की, आपण असे कायदेशीर विषय आणू व एक-एक कॉपी देणार होते. त्याचे काय झाले?

**मा. सभापती :-**

त्यांचा अहवाल आपल्याकडे आलेला आहे, त्या अहवालाचे वाचन करण्यांत येणार आहे.

**रिटा शाह :-**

संपूर्ण अहवाल एकत्र आहे का?

**मा. सभापती :-**

होय, एकत्र आहे.

**रिटा शाह :-**

आपण अहवालाचे वाचन करा. पण आम्हांला त्याची प्रत द्या.

**मा. सभापती :-**

अहवाल वाचून झाल्यानंतर आपल्याला प्रत देण्यांत येईल.

(मा. सभापती सो. ह्यांच्या परवानगीने प्र. सचिवांनी संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान कार्यवाहीसाठी नेमलेल्या अधिका-यांचे प्रभागनिहाय अहवालाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, प्रभाग क्र. २४ मध्ये राजकुमार कांबळे हे आले नव्हते. कारण मी त्यांच्याबरोबर फिरत होतो.

**प्र. सचिव :-**

प्रभागाकडून आलेल्या अहवालाचे वाचन करण्यांत आले.

**मा. सभापती :-**

जो विभागनिहाय अहवाल दिला आहे त्या अहवालावर पुर्ण चर्चा करा. त्याच्यात त्रुटी काय आहेत? त्याच्यात कोणती कामे झालेली आहेत? कोणती कामे का झाली नाहीत? त्याच्यावर चर्चा होऊन आपण त्याच्यावर निर्णय घ्यायचा आहे. आता जो अहवाल वाचला त्याच्यात मोठ्या नाल्याची स्थिती काय आहे?

**प्र. सचिव :-**

सुभाषचंद्र बोस मैदानाला लागून नाला आहे, मुर्धा खाडी, मुर्धा रेवागर आहे, राई शिवसेना शाखेचा नाला आहे. चिखलखाडी नाला व उत्तन पाली नाला आहे.

**मा. सभापती :-**

त्याची स्थिती काय आहे?

**प्र. सचिव :-**

सदर नाल्यात कचरा साफ केला असून काही प्रमाणात गाळ काढलेला आहे. सदर नाल्यात खुप मोठ्या प्रमाणात गाळ असून गाळ काढणे आवश्यक आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, मी १० तारखेला ऑफीसला भेट दिली त्याच्यात मी पाहणी केली. तर तिथे डी.पी. पावडर अजिबात नव्हती. निंबॅसिन आणि बायटेक्स अजिबात नव्हते. केऑथ्रिन अजिबात नव्हते. एम.एल.ओ. आता काहीतरी १०-१५ लिटर आले आहे आणि जे फ्लायगॉन असे काहीतरी औषध आहे. तेही औषध अजिबात नव्हते. निंबॅसिन आणि बायटेक्स ती दोन्ही औषधे एकत्र करुन मारतात. पण ह्याच्यापैकी निंबॅसिन जे औषध होते आणि तेच औषध मारत होते. दोन्ही मिक्स असे त्यावेळेलाही नव्हते. तर आपण औषधासाठी एवढे पैसे दिले व येथे डेंग्युसारखी साथ सुरु झाली व लोक घाबरली. अशा परिस्थितीमध्ये तिथे औषधे नाही ह्याचा अर्थ काय होतो? उत्तनला अजिबात औषध नाही, ह्याचा अर्थ काय होतो?

**मा. सभापती :-**

आता ज्या विभागाची आपण नांवे वाचली ते अधिकारी कोण कोण आहेत?

**प्र. सचिव :-**

श्री. दशोरे साहेब - कार्यकारी अभियंता, श्री. स्वप्नील सावंत - प्रभाग अधिकारी, श्री. संदिप शिंदे - मुख्य आरोग्य निरिक्षक, श्री. कांतीलाल बांगर - स्वच्छता निरिक्षक, श्री. उत्तम रणगे - बांधकाम अभियंता आणि क्षेत्रिय अधिकारी - श्री. भरत जाधव.

**मा. सभापती :-**

ह्यांचा मेन अधिकारी कोण आहे? प्रभाग अधिकारी कोण आहे?

**प्र. सचिव :-**

श्री. स्वप्नील सावंत आहेत.

**मा. सभापती :-**

दशोरे साहेब नाही का? आपण अधिकाऱ्यांना बोलावले नाही का?

**मिलन पाटील :-**

साहेब, प्रत्येक सभेला हे अधिकारी नसतात. मागच्या वेळेलाही हीच गोष्ट झाली होती.

**स्वप्नील सावंत :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय. औषधे आरोग्य विभागामार्फत पुरवठा होतात.

**मा. सभापती :-**

त्या ठिकाणी जेव्हा साफसफाई सुरु झाली, ती साफसफाई सुरु होत असतांना औषधाचा त्यात अभाव दाखवला. ती वस्तुस्थिती आहे का?

**स्वप्नील सावंत :-**

औषध उपलब्ध करुन दिलेली त्याप्रमाणे आम्ही वापरली आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मी १० तारखेला गेलो होतो आणि त्यावेळी तिथे कुठेही औषधे नव्हती.

**मिलन पाटील :-**

स्वप्नील सावंत साहेब, अध्यक्षांनी तुम्हांला काय विचारले आणि तुम्ही उत्तर काय देता? औषधे उपलब्ध होती का?

**स्वप्नील सावंत :-**

साहेब, आम्हांला एम.एल.ओ. वगैरे औषधे उपलब्ध झाली होती.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आम्ही येथे ह्या ऑफीसला भेट दिली तिथे ती औषधे नव्हती.

**स्वप्नील सावंत :-**

साहेब, त्यांनी आम्हांला मोहिमे अंतर्गत औषधे उपलब्ध करुन दिली होती. स्वतः माझ्याकडे व श्री. बांगर यांच्याकडे उपलब्ध करुन दिली होती.

**जोजफ घोन्सालवीस :-**

प्रत्येक औषधाची सविस्तर माहिती घेतलेली आहे की, कुठल्या तारखेला किती औषधे घेण्यांत आली?

**मा. सभापती :-**

या विभागात एस.आय. कोण आहेत?

**स्वप्नील सावंत :-**

श्री. बांगर हे ह्या विभागात एस.आय. आहेत.

**मा. सभापती :-**

श्री. बांगर हे कुठे आहेत?

**संदिप शिंदे :-**

त्यांच्या आईच्या डोळ्याचे ऑपरेशन आहे. म्हणून ते आले नाहीत.

**मा. सभापती :-**

आरोग्याचे जे जे अधिकारी आले नाहीत, एस.आय. त्यांचे पहिलेच कारणे वगैरे आम्हांला द्या म्हणजे आपल्याला पुढे बोलतांना बरे होईल. कोण कोण अधिकारी तुमचे एस.आय. आले नाहीत? ज्यांना आपण ही माहिती दिलेली आहे, त्याच्यातले कोण कोण अधिकारी आले नाहीत?

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, जे कोण अधिकारी आले नसतील त्यांच्यावर कारणे दाखवा नोटीस बजावा. कारण आपण सभा एक आठवड्या अगोदर अजेन्डा देता.

**मा. सभापती :-**

पण प्रभाग अधिकाऱ्याला तेही माहिती नाही की, औषधे होती का नव्हती? स्वप्नील सावंत, आपल्याला सदस्यांनी हे विचारले आहे की, ह्या वेळेला औषधे उपलब्ध होती का नव्हती?

**स्वप्नील सावंत :-**

साहेब, मोहिमे अंतर्गत औषधे आम्हांला उपलब्ध करुन दिली होती.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कुठल्या महिन्यात, कुठली औषधे उपलब्ध करुन दिली होती?

**मा. सभापती :-**

आता जे संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान सुरु झाले त्यावेळी त्यांच्याकडे औषधे उपलब्ध होती असा त्यांचा रिपोर्ट आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

नाही.

**मा. सभापती :-**

आणि आपण सांगता की नाही.

**रिटा शाह :-**

संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान मोहिम कुठल्या तारखेला सुरु झाली?

**जोजफ घोन्सालवीस :-**

किती तारखेला सुरु झाली?

**स्वप्नील सावंत :-**

दोन तारखेला सभा झाली आणि ३ तारखेपासून सुरु झाली.

**रिटा शाह :-**

कुठल्या २ तारखेला, कुठला महिना, कुठला साल?

**स्वप्नील सावंत :-**

२ डिसेंबर, २००४.

**मिलन पाटील :-**

आणि ती मोहिम कधी संपली?

**स्वप्नील सावंत :-**

१० डिसेंबर, २००४ ला संपली.

**सुर्यकांत भोईर :-**

तुमच्याकडे प्रत्येक दिवसाचा रिपोर्ट असेल, त्याचा आढावा द्या. त्याचा आढावा तुम्ही वाचून दाखवा. हे जे विचारतात त्याचा आढावा तुम्ही वाचून दाखवा की, रोज तुम्ही काय साफसफाई केली? कुठे औषध मारले? ते तुम्ही वाचून दाखवा. म्हणजे त्यांच्या प्रश्नाला उत्तर मिळेल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

केऑथ्रीन तुम्ही ३ तारखेला १२/१०/०४ ला तीन लिटर आणले होते.

**स्वप्नील सावंत :-**

याबाबतचे दैनंदिन अहवाल मा. उपायुक्त पानपट्टे साहेबांकडे दिलेले आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

स्वप्नील साहेब, अहवाल आपण बनविला असेल ना?

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान हे डेंग्यु आणि मलेरिया पसरल्या नंतरची आपली मोहिम आहे. तेव्हा आपण सुरुवात केली, तेव्हा आपण जागे झालोत. याचा अर्थ औषधे नव्हती आपण तेव्हा जागे झालो आणि वापरली.

**रिटा शाह :-**

संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान मला असे वाटते की, मुझफ्फर साहेब जेव्हा उपमहापौर होते म्हणजे पहिल्या वर्षी, तेव्हापासून हे मोहिम अभियान आपण सुरु केलेले आहे. आता हे जे २ डिसेंबर सांगतात, ती मोहिम आपण डेंग्युचे पेशन्ट भेटले त्यानंतरच्या मोहिमेची ही गोष्ट आहे. पण सुरुवातीचे काय? तेव्हाच्या औषधांचे काय? तेव्हाची औषधे कुठे वापरली आणि किती वापरली व आपल्याकडे कुठले मेजरमेन्ट आहे?

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण बायटेक्स २५/१०/०४ ला आणले होते त्याच्यानंतर आणलेच नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी प्रश्न उपस्थित केला की, डेंग्युची साथ सुरु झाल्याचे जेव्हा आपल्या निदर्शनात आले की, डेंग्युची साथ सुरु आहे, त्याच कालावधीत आपल्याला जेव्हा संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान सुरु होते. त्याच्या फेरी असतात. म्हणजे संपुर्ण शहरामध्ये त्याच्या साफसफाईकरिता टप्प्याटप्प्याने फेऱ्या असतात. त्यावेळेला डेंग्युच्या साथीचे आपल्या निदर्शनास आले आणि त्याचवेळेला जे आपले स्वच्छता अभियान आहे ह्याची फेरी त्याचवेळी आली आणि त्या फेरी अंतर्गत साफसफाईची दोन्ही कामे सुरु झाली. त्यामुळे जे स्वच्छता अभियान सुरु आहे ते पुर्वीपासून सुरु आहे. परंतु, ह्या वेळेला ज्या फेऱ्या असतात, जो टप्पा असतो त्या टप्प्याचा अवधी, कालावधी आणि आपल्याला डेंग्युबद्दल जी माहिती मिळाली ती एकच वेळ झाली आणि त्याच्यात आपण ते सुरु केले.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ते आता सांगतात की, आम्ही २ डिसेंबरला अभियान सुरु केले आणि तेव्हा तुम्ही औषधे पाठविली.

**स्वप्नील सावंत :-**

सभेमध्ये ठरल्याप्रमाणे जी टीम निर्माण केली त्या ग्रुपमधून आम्ही काम केले त्यावेळेस एस.आय. आरोग्य विभागाने ती औषधे दिलेली आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

२५/१०/०४ ला बायटेक्स दिली त्याच्यानंतर तिथे औषधेच नाही. म्हणजे ऑक्टोबरला आले आणि नोव्हेंबर, डिसेंबर एक महिना पुर्ण औषधच नाही. एम.एल.ओ. डिसेंबर महिन्याच्या १० तारखेला ३५ लिटर पाठवले होते. आता मी १० तारखेला गेलो तेव्हा ते संपलेले होते. फ्लायगॉन तुम्ही जुलै महिन्यात १० लिटर पाठविले होते. त्याच्यानंतर ते औषधच नाही.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, ही सत्य परिस्थिती आहे. कारण वेळोवेळी आम्हीही वॉर्डात विचारतो की, औषध आणा. तर तिथले मुकादम बोलतात, झाडू नाही, औषध नाही. ते आल्यावर पाठवू, आल्यावर टाकू. एवढ्या वर्षामध्ये फक्त कालच्या दिवशी आमच्या वॉर्डात धुर मारायची ती गाडी आली. म्हणजे एक वर्षभरामध्ये फक्त एकदा ती गाडी आली.

**मा. सभापती :-**

आपण ही जी औषधाची त्रुटी दाखविली, दुसरे काय?

**जोजफ घोन्सालवीस :-**

दुसरे असे की, हे जे ठेक्याचे कामगार आहेत ह्यांच्यावर कुणाचा कंन्ट्रोल आहे, आपल्या नगरपालिकेचा की, ठेकेदाराचा?

**मा. सभापती :-**

आपलेही काम आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपलेही आहे. पण प्रथम कुणाचे आहे? ठेकेदाराचे आहे ना?

**मा. सभापती :-**

नाही. आपण त्याला टेंडरचा ठेका दिला व ठेका दिल्यानंतर त्याच्या कामाची पाहणी, काम कसे करतात, काय चालले आहे ह्याच्यावर संपुर्ण आपली देखरेख असायला पाहिजे. ठेकेदाराला काम दिल्यानंतर तो काम करेल पण तो ते काम कसे करतोय ते आपल्यावर अवलंबून आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जेव्हापासून आमच्या प्रभागात त्या ठेकेदाराने ठेका घेतलेला आहे, तेव्हापासून त्याने एकदाही आमच्याबरोबर संपर्क केला नाही आणि मला माहितीसुद्धा नाही की, तो ठेका कोणी घेतला आहे? आणि आमच्या तीन विभागांमध्ये जवळ जवळ ६९ कामगार आहेत. तिथे फक्त एक टेम्पो आहे आणि ह्यांना आतापर्यंत झाडू दिलेले आहेत, ६ पंजे दिलेले आहेत, ६ फावडे दिलेले आहेत, ५ टिकाव दिलेले आहेत आणि १६ ब्रश दिलेले आहेत आणि एकूण कामगार आहेत ६९. ह्या अल्पशा वस्तूत हे कामगार कसे साफसफाई करतील?

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर आपण प्रभागनिहाय जी टेंडर काढली व ते टेंडर काढतांना त्यांना त्यांची व्याप्ती दिली होती की, ह्या व्याप्तीमध्ये तुम्हांला एवढे काम करायचे आहे. त्यासाठी लागणारे साहित्य, लागणारे कर्मचारी, लागणारे वाहन हा सर्व निकष आपण ठरवून दिल्यानंतर

त्याचे आपण टेंडर कॉल केले. टेंडर कॉल केल्यानंतर त्या ठेकेदाराने बघायचे आहे की, आपल्याला ह्या व्याप्तीमध्ये जर मला ४ कि.मी.चा एरिया दिलेला आहे किंवा ४० कि.मी.चा विभाग दिलेला आहे. त्याच्यात असणारी ही माणसे आहेत. त्या माणसांतर्फे मला साफसफाई करुन घ्यायची आहे. मी साफसफाई करु शकत नाही. माणसां अभावी, वाहनां अभावी, साहित्याच्या अभावी मी साफसफाई करु शकत नाही. तर त्यांनी त्या टेंडरमध्ये आपले टेंडर घेऊ किंवा त्यांनी ते टेंडर भरु नये. मग खाजगीकरणाचा भाग असा आहे की, खाजगीकरणामध्ये जर त्याला परवडते, तो करु शकतो तर त्या स्पर्धेने त्याने टेंडर घेतले पाहिजे आणि अन्यथा त्याला जमत नसेल तर त्याने टेंडर घेऊ नये. त्याला माणसे कमी पडतात किंवा त्याला साहित्य कमी होते किंवा त्याला वाहने कमी पडतात हा भाग त्याचा आहे. ते त्याच्यावर अवलंबून आहे. त्याने एकदा टेंडर घेतल्यानंतर त्या ठिकाणी लागणारी शंभर माणसे, वीस माणसे व त्यात येणारी ऐंशी माणसांची तफावत त्याने भरून काढायची आहे. मग ते ठेकेदारावर अवलंबून आहे. ठेकेदाराला जर काम करतांना ते त्याला परवडत नसेल तर त्याने ठेका घेऊ नये.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण तो कामगारांना साहित्य पुरवत नसेल व त्यामुळे साफसफाई होत नाही तर त्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाका, ठेका रद्द करा. कारण एवढ्याशा साहित्याने ६९ कामगार काय काम करणार?

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो ठिक आहे. कारण एका नगरसेवकाने स्वतःच्या प्रभागात आरोग्याबाबत चाललेले बेकाळजीपणा त्यांनी आपल्यासमोर आता ठेवले. पण त्या विभागात काम करणारे आपले ऑफीसर, एस.आय., कर्मचारी वर्ग आपल्या प्रशासनाने काय लक्ष दिले? त्यांचा आपल्याकडे काय रिपोर्ट आहे? हे बोलतात की, औषध नाही, झाडू नाही, हे नाही ते नाही. तर ते ठेकेदाराची गोष्ट आहे. आपण त्याला ठेका दिला तर त्याने किती आणि काय साहित्य आणायचे, ते ठिक आहे. पण त्या हिशोबाने शहराला झालेले प्रॉब्लेम त्या विभागाला झालेला प्रॉब्लेम आणि तिथे आरोग्य विषयी निर्माण झालेला प्रॉब्लेम. त्याबद्दल आपल्या प्रशासनाने आपल्याकडे काय रिपोर्ट सादर केलेला आहे?

**मा. सभापती :-**

आपण जे औषधाबद्दल आणि कर्मचाऱ्यांबद्दल सांगितले आणि आणखीन ह्या भागाबद्दल, विभागाबद्दल आपले काय प्रश्न असतील ते प्रश्न आपण येथे मांडा आणि आपण एकाच वेळेला प्रशासनाला त्याबद्दल उत्तर द्यायला लावू.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जेव्हा ह्या ठेकेदाराने ठेका घेतला तेव्हा अशा आपल्या साहित्याबद्दल काय काय अटी आहेत की, त्याने किती कर्मचाऱ्यांना किती साहित्य पुरवायचे?

**मा. सभापती :-**

ती माहिती तुम्हांला देण्यांत येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

उत्तन पाली जो नाला आहे. त्याच्यावर औषध मारा असे मी बरेचदा सांगितले आणि मी तिथे जेव्हा काल गेलो तेव्हा तिथे साधारण १० लिटर औषध मारले असे त्यांनी मला सांगितले.

**मा. सभापती :-**

याबाबत विभागात आणखीन काही प्रश्न आहेत का?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने, प्रभाग क्र. १, २, १८ आणि १९ या संदर्भामध्ये सध्या आलेल्या अहवालावर चर्चा आहे. सन्मा. सदस्य घोन्सालवीसजी यांनी या ठिकाणी काही मुद्दे उपस्थित केले. सर्वप्रथम सभापती महोदय, मी तुम्हांला सांगू इच्छितो की, प्रत्येक प्रभागामध्ये, प्रत्येक नगरसेवकाला आणि संबंधित एस.आय.ला एक रजिस्टर मेन्टेन करायला सांगितले. त्याच्यामध्ये तुमचे असणारे साफसफाई कर्मचारी, त्यांच्यावर देखरेख ठेवणारा मुकादम आणि त्यांना औषधासाठी व साफसफाईकरिता जे काही साहित्य लागते तर या ठिकाणी मी माझी भुमिका जर का अशी मांडली, स्पेशली माझ्या भागामध्ये या मोहिमे अंतर्गत एक चांगले काम आदर्श झालेले आहे. पण कदाचित विसंगत होईल. पण जी वस्तुस्थिती आहे ती समोर मांडणे गरजेचे आहे. काही ठिकाणी त्रुटी राहून गेलेल्या आहेत. तेसुद्धा तेवढेच खरे आहे. कारण घोन्सालवीसजी जे बोलतात त्यांच्या मताशी सुद्धा मी सहमत आहे. काही ठिकाणी औषधे बऱ्याच ठिकाणी कमतरता आढळलेली आहे. मजुरांचा जो विषय आहे. तोसुद्धा त्यांचा बरोबर आहे की, विस्तीर्ण असा प्रभाग आहे. चार प्रभाग मिळून फक्त ६९

कर्मचारी तिथे काम करत आहेत. तर सन्मा. सदस्य घोन्सालवीस साहेबांनी जी काही मते मांडली आहेत त्याच्यावर आपण योग्य तो निर्णय घ्या आणि ह्या मोहिमे अंतर्गत औषध फवारणी करतांना मच्छरांचा जो दिवसेंदिवस प्रभाव वाढलेला आहे, भाईंदरला ब-याच ठिकाणी बघितले की, त्या मोहिमे अंतर्गत साफसफाई हाती घेतले होते. परंतु, आमच्या प्रभागामध्ये आमच्या परिसरामध्ये त्या मोहिमे अंतर्गत मच्छरांचा जो प्रादुर्भाव वाढलेला आहे त्याच्यावर अजून औषध उपचार काहीच झालेले नाही. तर तसे कृपया संबंधित विभागाला तुम्ही तसे आदेश द्या आणि ताबडतोब आज किंवा उद्यामध्ये ती औषध फवारणी अंतर्गत ते काम सुरु करा.

**मिलन पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये जे ग्रामपंचायती काळापासून एम.एल.ओ. आणि बायटेक्स ही दोन औषधे आपण फवारत होतो आणि एम.एल.ओ.च्या फवारणीने गटारावर एका प्रकारचा तेलाचा थर साचायचा. त्याच्याने डासांची अळी उत्पन्न होत नव्हती. तर ते चांगले स्वस्तसुद्धा आहे आणि मस्त आहे. तर ते स्वस्तापेक्षा मस्त आहे. हे आपण आता बंद केलेले आहे आणि आपण भलती सलती औषधे मारतो आणि त्याचा उपयोग आपल्याला काय होतच नाही. आपला पैसा फुकट जातो. वेगळ्या औषधाला आपण पैसा जास्त देतो पण त्याचे जे परिणाम पाहिजे ते होतच नाही. तर आपण एम.एल.ओ. आणि बायटेक्स का बंद केले? ह्याचे मला आपल्याकडून उत्तर मिळेल का? आणि हे जर आपण वापरले तर आपल्याला नुकसान काय?

**जोजफ घोन्सालवीस :-**

सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा मांडला की, जे ठेकेदाराचे कामगार आहेत. त्याच्यावर नगरपालिका ही त्या कामगारांवर कंट्रोल करते असे आपण आम्हांला सांगता. परंतु, प्रत्यक्षात जर बघितले तर मी त्या दिवशी व्हिजीट केले त्यावेळेला दहा कामगार गैरहजर होते. परंतु, तिथे गैरहजर असे लिहिले नव्हते. त्याचे कारण समजू शकेल का? त्या कॉलममध्ये गैरहजर लिहिले नव्हते म्हणजे ते कोणी बघितले नाही तर नंतर तिथे हजेरी लावायची का?

**हॅरल बोर्जीस :-**

तुमच्या येथे जे संबंधित मुकादम जे रजिस्टर मेन्टेन करतात. त्यावर तुमची सही घेतात का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

कुठली?

**हॅरल बोर्जीस :-**

प्रत्येक प्रभागामध्ये.

**प्रभात पाटील :-**

साहेब, हल्ली रजिस्टरच बंद झालेले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

ते बंद असेल तर त्याच्यावर तुम्ही लक्ष द्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सुरुवातीला रजिस्टर घेऊन आले तेव्हा मी त्यांना सांगितले की, आमचा प्रभाग मोठा आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

माझ्या प्रभागात मी अशी पद्धत ठेवलेली आहे की, माझ्या येथे जे काही सफाई कामगार आहेत ते प्रत्येक दिवशी त्यांचा जो मुकादम आहे तो ती वही घेऊन आमच्या येथे व्हिजीट करतो. असलेले कामगार, औषध किंवा इतर गोष्टींची त्यांना कमतरता असेल तर आम्ही तसे संबंधित विभागाच्या अधिका-याला कळवितो. जर ती पद्धत बंद असेल तर ती पद्धत सुरु ठेवा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण जरी तिथे भेटलो नाही व घरचे कोणीही भेटले तरी ते त्यांच्याकडून सही घेऊन जातात. ते जबाबदारीचे काम आहे आणि ते कोणाचीही सही घेऊन मोकळे होतात. तसेच सुरुवातीच्या वेळेला ते रजिस्टर घेऊन आले त्यावेळेला मी त्यांना सांगितले की, आमचा एरिया मोठा असल्या कारणाने तिथे आपण कामगार वाढवा. सभापती साहेब, परंतु त्यांनी सांगितले की नाही, तुमच्याकडे जर चार कामगार असतील तर त्यात एक मुकादम म्हणजे तीन प्रत्यक्ष काम करणारे असतात आणि एक त्यांच्यावर देखरेख करणारा असतो.

**मा. सभापती :-**

ठेकेदाराचे जे ॲग्रीमेंट झालेले आहे. तर त्या ठेकेदाराच्या ॲग्रीमेंटमध्ये असे नॉर्म्स आहेत की, लोकप्रतिनिधींना आपण जे काम करतात त्याचा अहवाल म्हणजे जे आम्ही काम केले त्याच्याबद्दल त्यांनी तुमच्याशी संपर्क साधुन ते काम करु घ्यायचे आहे आणि त्यांनी तुमच्याकडे संपर्क साधला पाहिजे अशा

पद्धतीचे त्या करारनाम्यामध्ये त्याची अट आहे त्या अटीप्रमाणे जे सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीसने सांगितले की, तो ठेकेदार तुम्हांला दररोज संपर्क करतो. त्याने तुम्हांलाही तुमच्या प्रभागातील ठेकेदाराने संपर्क करायला पाहिजे. तो संपर्क का केला नाही? तुम्ही त्याची विचारणा केली नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्याचा संपर्क अजूनपर्यंत माझ्याशी झाला नाही. त्याचीसुद्धा मला माहिती नाही की, कोणाला ठेका दिला आहे आणि जरी आपण ठेकेदार व नगरपालिका पगार देऊन स्वच्छता करतो. तर त्याला आणखीन संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान द्यायचे, काय अशी विशेष........

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य घोन्सालवीस साहेब, तुम्हांला अशी विनंती आहे की, हा जो साफसफाईचा अहवाल आपल्यासमोर आलेला आहे. ह्याच्यात ज्या काही त्रुटी राहून गेल्या असतील त्याच्यावर तुम्ही कृपया उपाययोजना सुचवा. जेणेकरुन आपल्या प्रभागात चांगल्या प्रकारे साफसफाईचे अभियान आपण पुर्ण करु शकतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यांनी शेरे मारलेले आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

ज्या त्रुटी असतील ते तुम्ही सभापती साहेबांना सांगा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यांनी शेरे मारलेले आहेत. ते गटार तुडूंब भरलेले आहेत, नाले साफसफाई नाही, डबकी साठून आहे, औषध नाही.

**प्रभात पाटील :-**

साहेब, या अहवालावर त्रुटींवर आपण उपाययोजना करायची. त्यांनी घाण करायची आणि आपण फवारणी द्यायची. आपण त्यांना मग पैसे कशाला मोजतो?

**जोजफ घोन्सालवीस :-**

आणि विशेष म्हणजे डेंग्युसाठी साफसफाई असतांना तिथली परिस्थिती येथे आहे.

**रिटा शाह :-**

आपला गेल्या वेळेस विषय तोच चालला होता की, त्यांनी आपल्याला रिपोर्ट दिलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

असे ठेकेदार ठेवायचे कशाला? त्यांना सरळ ब्लॅक लिस्टमध्ये टाका.

**रिटा शाह :-**

नालेसफाई झाली नाही, औषध फवारणी झाली नाही, साहित्य मिळाले नाही. मग ठेकेदाराने काय केले? आपण त्यांचे बिल कसे पास केले? आपण उपाययोजना काढू. आपण नविन ठेकेदार घेऊन आपण देखरेख करु, ती उपाययोजना करु. पण त्या ठेकेदाराला आपण ब्लॅक लिस्टमध्ये टाका. झाले त्याचे काय? पैसे वाया गेले त्याचे काय?

**प्रभात पाटील :-**

झाले त्याचे काय?

**जोजफ घोन्सालवीस :-**

एकंदरीत असे आहे की, कामगार कामावर येत नाहीत आणि त्याची हजेरी लागते व पैसे नगरपालिकेकडून मिळतात.

**रिटा शाह :-**

बिल पास झाले आहे. जर तुमचा रिपोर्ट असा आहे तर बिल कसे काय पास झाले?

**मिलन पाटील :-**

ह्याच्यावर एस.आय.चा रिपोर्ट काय?

**रिटा शाह :-**

तेच विचारले, प्रशासनाने ह्याच्यावर काय रिपोर्ट दिलेला आहे?

**मिलन पाटील :-**

पैसे द्यावे की नाही? एस.आय.चा रिपोर्ट कय? त्याला काय दंड दिलेला आहे?

**रिटा शाह :-**

त्याचे बिल पास करायचे का नाही किंवा त्याने असे केले, तसे केले. त्याचा काहीतरी रिपोर्ट तरी दिला असेल.

**मा. सभापती :-**

मघाशी जो विषय झाला, स्वच्छता अभियान कशाला पाहिजे असे सन्मा. सदस्य घोन्सालवीसजी आपणच बोलतात.

**रिटा शाह :-**

स्वच्छता अभियान पाहिजेच कशाला?

**जोजफ घोन्सालवीस :-**

माझ्या बोलण्याचा उद्देश असा की, अभियान कशाला पाहिजे? आपण कामगार ठेवलेले आहेत. तेच कामगार काम करतात. तेच साफ करतात. मग अभियान हे स्पेशल कशाला?

**मा. सभापती :-**

तेच आपल्याला सांगातो. आपण स्वतः अभियान हे राबवायला घेतले नाही. राज्य शासनाने संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, साफसफाईचे असे अभियान दिले. त्या अभियानाकरिता आपल्याला पारितोषिक ठेवण्यांत आली आणि संपूर्ण राज्यभर नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायत यांना कम्पलसरी हे अभियान दिलेले आहे आणि त्या अभियाना अंतर्गत त्यांची देखरेख राहील. ह्याच दालनामध्ये ह्याच्यापुर्वी एक महिन्यापुर्वी सभा झाली. त्या सभेत सचिव खटवा साहेब व त्यांच्याबरोबर अधिकारी आले होते. आपल्या महानगरपालिकेत असलेली गार्डन, शाळा, लॅटरीन बॉक्स, गटारे, रस्ते किंवा आपली विकास कामे ह्याच्यावर ते लोक आपल्याकडे येऊन पाहणी करुन गेले.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यांचा अहवाल काय आहे?

**मा. सभापती :-**

त्यांचा अहवाल नंतर येईल. त्यांच्या अहवालावर आपल्याला पारितोषिक मिळेल. पहिले, दुसरे, तिसरे किंवा कोणतेही नाही. जेव्हा आपल्यासमोर डेंग्युचा प्रकार आला आणि अभियानाबद्दल बोलतो, याबाबतीतमध्ये मी प्रशासनाला पत्र दिले.

(मा. सभापतींनी सभागृहात पत्राचे वाचन केले.)

म्हणजे जेव्हा सन्मा. सदस्य आपण या विषयावर चर्चा केली की, ह्या शहरात साफसफाई झाली पाहिजे. हे शहर एकदम स्वच्छ राहिले पाहिजे, निरोगी राहिले पाहिजे या दृष्टीकोनातून जे स्थायी समितीने ह्याचा आवाज उठवला आणि त्याची काळजी घेतली. त्याबद्दल मी त्या सर्व अधिका-यांना पत्र दिले. त्याच्यात डॉ. बावस्कर हे विशेष अधिकारी, दशारे - कार्यकारी अभियंता, मनाळे - सहाय्यक आयुक्त, गणेश पाटील, हरेश पाटील - सचिव, हेमत पाटील, किरण राठोड, श्री. भोपळे - सहाय्यक नगररचनाकार, संभाजी पानपट्टे - उपायुक्त सो., अजीज शेख - उपायुक्त सो. जे आपण स्वच्छता अभियान राबवले व त्याचे आपण प्रमुख जे नेमले होते, त्यांना सर्वांना आपण पत्र देऊन त्यांचा अहवाल मागवला. आज ज्या पद्धतीने सन्मा. सदस्यांनी मागच्या वेळेला चर्चा केली की, आपण शहरामध्ये खरोखर आरोग्याकरिता एवढे आपले पैसे खर्च करतो, आपण आपले अधिकारी त्या ठिकाणी राबवितो, पण शहरामध्ये ज्या पद्धतीने साफसफाई होऊन आपले समाधान व्हायला पाहिजे ते समाधान होत नाही आणि डेंग्युसारख्या साथीमध्ये डेंग्यु सारख्या रोगामध्ये एखादा मृत्युमूखी पडतो. साथ हा शब्द काही लोकांनी लावला. परंतु, मृत्युमूखी पडल्या कारणाने ती साथ होऊ नये त्याची आपण कटाक्षाने जबाबदारी पार पाडली पाहिजे आणि त्याचवेळेला हे संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान आले आणि हे राबवितांना आपण त्याच्या खबरदा-या घेतल्या पाहिजे. म्हणून आज हा विषय घेऊन जो अहवाल आलेला आहे त्या एखाद्या विभागाकडून अहवाला आल्यानंतर ठेकेदाराने कोणकोणती कामे केली नाही. अधिका-यांनी कोणते लक्ष दिले दिले नाही, औषध फवारणी का झाली नाही? औषधात कोणत्या त्रुटी होत्या? आणि जे साहित्य फावडे, गमबुट किंवा अन्य काही सामाने दिली त्या साहित्यात काही त्रुट्या होत्या का? त्यांनी तुमच्याशी थेट संपर्क साधला का नाही साधला? त्यांनी त्या अटीप्रमाणे जो करारनामा दिलेला आहे त्या करारनाम्याप्रमाणे तुमची कामे केली का नाही केली? ह्याच्याविषयी आपल्याला जो अहवाल घ्यायचा आहे तो अहवाल दिलेला आहे आणि त्याची प्रत मी तुम्हांला सभा संपेपर्यंत देतो. त्याचा जो अहवाल सचिवांनी वाचला व त्याच्यात ज्या काही त्रुट्या आहेत. ते विभागव्हाईज आपण बोलू या आणि त्याच्यावर संपूर्ण त्रुटी असल्यामुळे आपण प्रशासनाला त्याच्यावर उत्तर द्यायला लावू. कारण आपल्या ज्या त्रुट्या आहेत त्या त्रुटीमध्ये आपण आपले प्रश्न जरुर मांडा आणि प्रशासनाला आपण त्याच्यावर उत्तर द्यायला लावू व त्या उत्तरामध्ये आपल्याला समाधान मिळाले नाही तर ते समाधानकारक होण्याकरिता आपण काय कारवाई केली? कोणती कार्यवाही केली पाहीजे? त्याबद्दलची विचारणा आपण केली पाहिजे. त्या अनुषंगाने ह्या विभागात सांगितले की, औषध फवारणी बरोबर झाली नाही. तिथे ती औषधे नव्हती. आपल्याला सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी

सांगितले की, ह्या पद्धतीचे औषध असायला पाहजे. आपण नंतर सांगितले की, कामगारांची जी त्रुटी आहे ती पुर्ण कशी झाली पाहिजे? कोणत्या पद्धतीने आपण कामगार दिले पाहिजे? कामगारांची जबाबदारी कोणावर आहे? हे प्रश्न आपण ह्या ठिकाणी विचारले. तसेच सन्मा. सदस्या मॅडमनी विचारले की, ठेकेदाराने कामे केली की, त्यांना आपण संधी दिली पाहिजे. संधी देण्यापेक्षा त्यांची जी जबाबदारीची कामे आहेत ती कामे त्यांनी केली पाहिजे. अशा पद्धतीत ह्या विभागवाईज ज्या त्रुट्या आपण सांगाल त्या त्रुटींबद्दल आपण प्रशासनाला ह्याचे उत्तर द्यायला लावू. प्रशासनाने उत्तर देतांना जर आम्हांला असमाधानकारक उत्तर मिळाले तर त्याच्यावर कोणती कार्यवाही केली पाहिजे किंवा त्यांना कोणता जाब विचरला पाहिजे? त्या पद्धतीचे उत्तर आपण त्यांच्याकडून अपेक्षित करु आणि त्याच्यावर आपण त्यांच्याकडून निर्णय घेऊ. हा निर्णय आपणाला घ्यायचा आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, आपण मॅडमचा उल्लेख केला म्हणून तुमचे मी पहिले धन्यवाद करते की, मागच्या वेळी आपला विषय नव्हता व आपली चर्चा झाली तेव्हा उपायुक्त (मुख्यालय) रणखांब साहेबांनी आपल्यासमोर तो अहवाल सादर केला. त्याबद्दलचे त्यांचे धन्यवाद आणि आपण त्यांचे अभिनंदनही केले की, प्रशासनाने केलेल्या चुका आमच्यासमोर ठेवल्यात अशा प्रकारचे अभिनंदन झाले. प्रशासन कुठे चुकले असे मला वाटत नाही. कारण प्रशासनाचे जे एस.आय. आपले कर्मचारी वर्ग आहेत. कारण आपण आता प्रायव्हेट ठेके देतो. प्रायव्हेट ठेके नाले साफसफाईकरिता, प्रायव्हेट ठेक्याने झाडू मारायचे, गटारे साफसफाई करायचे. ते ठेकेदारांनी ईमानदारीने आपण जे बिल त्यांना पास त्या हिशोबाने त्यांनी नालेसफाई केलेलीच नाही आणि नुसते बिल पास झालेले आहे. गटार देखील त्या हिशोबाने साफ झालेले नाही. मागची पाच वर्षे झाली जो तुमचा रिपोर्ट दाखवतो त्या रिपोर्टच्या हिशोबाने नालेसफाई, गटार सफाई झाली नाही व तसे औषध फवारणीही झाली नाही. ह्याच्यामध्ये प्रशासन कुठे चुकले. तेव्हा त्याच्यावर असलेला एस.आय. त्याच रिपोर्ट असतो की, अमुक अमुक ठेकेदाराने केलेली नालेसफाई बरोबर व्यवस्थित आहे, गटार सफाई केलेली व्यवस्थित आहे, झाडू मारलेले व्यवस्थित आहे, साहित्य दिलेले बरोबर व्यवस्थित आहे त्या हिशोबाने त्यांचे बिल पास होते. मग असे एस.आय. आणि विभागीय प्रमुख त्यांनी दिलेले हे खोटे रिपोर्ट कारण आपला रिपोर्ट काहीतरी सांगतो आणि त्याने दिलेला रिपोर्ट. त्यामुळे त्याने दिलेला रिपोर्ट चुकीचा असेल किंवा ह्यांनी दिलेला रिपोर्ट चुकीचा असेल. मग ह्याच्यामध्ये खरोखर कोण चुकले? ठेकेदार चुकले की, प्रशासकीय अधिकारी चुकले की आपले एस.आय. चुकले? आणि ह्याच्यामध्ये आपली कार्यवाही बरोबर आहे. आपण जे सभेमध्ये ठरवतोय त्याने आपली कार्यपद्धती बरोबर असते. पण त्या कार्यपद्धतीवर करण्याचे काम ते चुकीचे आहे. कारण ठेकेदार हा काम घेतो आणि काम काहीच करत नाही. हा आजचा विषय नाही. जेव्हा जेव्हा आरोग्याचा विषय उद्भवतो तेव्हा मी विषय उचलला आहे की, आपण कामगार घेतो. जसे दिडशे पाहिजे, सहाशे पाहिजे, आठशे पाहिजे. पण जागेवर कामगार येत नाही आणि त्याची कशी हजेरी लागते आणि कसे काय त्यांचे बिल पेमेन्ट होते? तिथे प्रशासन चुकते व ते आजपर्यंत तिथे चुकलेले आहे. आज आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये जे आपल्याकडे प्रभागव्हाईज रिपोर्ट सादर झाले व जिथे नालेसफाई, गटारसफाई झाले नाही. डेंग्यु सारखा रोग झाले, औषध फवारणी नाही म्हणजे आपण ऑन दि पेपर कार्यपद्धती केलेली आहे. प्रॅक्टीकल आपल्याकडे काय फार कमी प्रमाणात झालेले आहे. म्हणून हा प्रश्न उद्भवला आहे आणि आतापर्यंत असे जेवढ्या ठेकेदाराने कामे घेतलेली आहेत त्यांचे ठेके रद्द करा असा मी ठराव मांडत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

माझे त्याला अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रिटा शाहजी ह्यांनी आपल्या कामाच्या पारदर्शकतेबद्दल जी सविस्तर माहिती दिली ह्या माहितीमध्ये जर आपले कोणते रिमार्कस् गेलेले नसतील तर त्याशिवाय बिल पेमेन्ट होऊ शकत नाही. अशा पद्धतीचा प्रश्न त्यांनी येथे केला. मी ह्याबद्दल डॉ. बावस्करांना सांगू इच्छितो की, अशा बद्दलची माहिती आपल्याकडे आहे का? आणि तशी माहिती असेल किंवा असे रिमार्कस् दिले असतील. कारण साफसफाईची ज्या विभागाशी चर्चा चालू आहे त्या विभागामध्ये मोठे नाले साफ झालेले नाही. ठेकेदार हा लोकप्रतिनिधीला भेटत नाही, गटारे साफ झाली नाहीत, औषध फवारणी बरोबर झालेली नाही. त्याच्याबद्दल ज्या सदस्याने चर्चा केली. त्या सदस्यांच्या चर्चेला उत्तर डॉ. बावस्कर ह्यांनी ह्या विभागापुरते द्यावे.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, नालेसफाई आपण कित्येक वर्षापासून एक किंवा दोन वर्षापासून नाही तर कित्येक वर्षापासून नालेसफाई ही फक्त पावसाळ्यापुरती करतो, पावसाळ्याच्या अगोदर आपण नालेसफाई करतो. पावसाळ्यानंतर आपल्या कामगारांकडून ज्या ज्या ठिकाणी गरज असेल व पुर्ण नाले आपण पावसाळा संपल्यानंतर नाल्यात मोठ्या प्रमाणात गाळ आणि कचरा जमा होतो. आपल्या कामगारांकडून नाल्यातील कचरा काढून नाले प्रवाही ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. नालेसफाईच्या बाबतीत जर या विषयी माझे तर स्पष्ट मत आहे की, कारण आपले नाले पक्के नाले नाहीत, आपले नाले बांधलेले नाहीत, आपण पावसाळ्यापुर्वी वेळेवर कच्च्या नाल्याची खुदाई करतो. त्यातील गाळ काढतो. कच्च्या नाल्याची खुदाई करतांना त्यातून कितीही गाळ काढला आणि पुन्हा जरीही साफ करायला गेले तर त्यातून गाळ हा निघणार आहे. नाले पक्के नसल्यामुळे हा प्रश्न उद्‌भवतो आणि ही नालेसफाई वर्षातून दोन किंवा तीन वेळेला अशा प्रकारे चालू ठेवली तर असा प्रश्न उद्‌भवणार नाही. कामगारांकडून आपण फक्त दैनंदिन कामासाठी नाल्याचे प्रवाह अडू नये, मोठ्या प्रमाणात नाल्याचे प्रवाह अडू नये किंवा नाले तुंबू नये यासाठी आपण कार्यवाही करतो. परंतु, जी नालेसफाई केली जाते ती फक्त पावसाळ्यापुर्वी केली जाते.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, नालेसफाईचे टेंडर वेगळे निघते का?

**डॉ. बावस्कर :-**

होय, नालेसफाईचे टेंडर वेगळे निघते.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य कृपया त्यांना त्यांचा खुलासा करु द्या व त्यानंतर तुम्हांला जे आपले मत मांडायचे आहे ते मांडावे.

**डॉ. बावस्कर :-**

आणि या बाबतीत आपल्या ज्या सुचना असतील त्या सुचनांची दखल घेऊन आपण यापुढे कार्यवाही करु. परंतु, नालेसफाई ही आपण फक्त जे टेंडर कॉल केलेले असेल किंवा जे टेंडर मागवलेले असेल ते पावसाळ्यापुर्वीच्या नालेसफाईकरिता असते. आज जो साफसफाईचा ठेका आपण दिलेला आहे या साफसफाईच्या ठेक्यामध्ये नालेसफाईचा अंतर्भाव नाही. कारण ओव्हर लॅप होऊ नये, डबल खर्च होऊ नये किंवा ओव्हरलॅप होऊ नये. नालेसफाईसाठी पावसाळ्यापुर्वी खर्च करायचा आणि यांनाही पैसे द्यायचे त्यामुळे ओव्हरलॅप होऊ नये म्हणून आपण या साफसफाईच्या ठेक्यामध्ये नालेसफाईचा अंतर्भाव केलेला नाही. तरीही नाल्याचे प्रवाह सुरक्षित राहावे, नाल्याचे प्रवाह चालू राहावे आणि कुठल्याही नाल्यामध्ये प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी आपण नियमितपणे आवश्यकतेनुसार नाल्याचे प्रवाह मेन्टेन करतो. नाल्याचा गाळ त्यावेळेला काढणे शक्य होत नाही. तसा गाळ पुर्णपणे काढू शकत नाही आणि कच्चे नाले असल्यामुळे त्यात कितीही खोदाई केली, किती खोल गेले तरी ते त्यातून गाळच निघणार आहे आणि गाळा हा निघतो तसा दुसरा प्रश्न, जे पाटील साहेबांनी सांगितले की, आपण बायोटेक्स आणि एम.एल.ओ. नियमितपणे वापरतो. त्याचा वापर आपण बंद केलेला नाही.

**मिलन पाटील :-**

त्याचे प्रमाण कमी झालेले आहे.

**डॉ. बावस्कर :-**

त्याचे प्रमाणसुद्धा कमी झाले नाही. प्रमाण चांगले आहे, मोठ्या प्रमाणात आहे आणि यापेक्षा मी सर्वांना विनंती करेन की, आपण विभागामध्ये भेटी देऊ या, आलेल्या औषधाची तपासणी करु या. कोणते अैषध किती प्रमाणात आले होते व कुठल्या कुठल्या इन्स्पेक्टरला किती औषधे दिली, ह्याचे रजिस्टर आपल्याकडे आहे आणि त्या त्या इन्स्पेक्टरला बोलावून आपण त्याची चौकशी करु या. या चौकशीला माझी कुठलीही हरकत नाही. त्यात सर्वांनी मिळून चौकशी करु. सर्वांचा हेतू एकच आहे की, ह्या कामात सुधारणा व्हायला पाहिजे. कुठलीही अनियमितता होऊ नये. मी जी औषधे आलेली आहेत, जे सन्मा सदस्य घोन्सालवीस साहेबांनी सांगितले, जी औषधे आपण बोललात त्यापैकी काही औषधे आपण फक्त मागच्या वेळेला, गेल्या वर्षी मागविली होती. ती औषधे ह्यावर्षी मागवलेली नाहीत. आपण बायोटेक्स आणि एम.एल.ओ. मोठ्या प्रमाणात वापरतो.

**मिलन पाटील :-**

परिणाम सांगा. चांगला आहे की वाईट आहे?

**डॉ बावस्कर :-**

बायोटेक्स आणि एम.एल.ओ.चा परिणाम चांगला आहे म्हणूनच आपण ती वापरतो.

**मिलन पाटील :-**

जास्त प्रमाणात का वापरत नाही?

**डॉ बावस्कर :-**

वापरतो, आपण मोठ्या प्रमाणात ती औषधे वापरतो.

**सुर्यकांत भोईर :-**

औषध फवारणी केल्यानंतर, ते मच्छर मरतच नाही, मच्छर उलट जास्त घरात येतात. तुम्ही बोलतात की, औषध मारतो. पण औषध मारल्यानंतर मच्छर जास्त तयार झालेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

निम्बोसीन त्याच्यात मिक्स करावे लागते ना? तेव्हाच आपण ते औषध मारु शकतो ना?

**डॉ. बावस्कर :-**

तसे काही नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

फक्त आपण एकटे एम.एल.ओ. फवारतो.

**डॉ. बावस्कर :-**

आपण फक्त एम.एल.ओ. फवारतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आपण मी एम.एल.ओ.बाबत नाही, बायोटेक्स बाबत विचारतो.

**डॉ. बावस्कर :-**

बायोटेक्स एकटेसुद्धा फवारले जाते व मिक्सींग असते.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जर हे दोन्ही मिक्स करुन मारले तर मच्छरांवर जास्त इफेक्ट होतो की, फक्त बायोटेक्स मारल्याने?

**डॉ. बावस्कर :-**

दोन्ही औषधे फवारल्याने इफेक्ट हा येतोच. एकटे मारल्यानेसुद्धा इफेक्ट हा येतो. बायोटेक्स हे आपण मोठ्या प्रमाणात फवारतो तसेच एम.एल.ओ. हेही आपण मोठ्या प्रमाणात फवारतो. आत्ताच जर आपल्याला सांगायचे झाले तर मागच्या एका महिन्यामध्ये आपण २० ते २२ हजार लिटर एम.एल.ओ. वापरले आहे. एम.एल.ओ. आपण कमी वापरत नाही. एम.एल.ओ. हे आपण डायरेक्ट इंडियन ऑईल कॉर्पोरेशनकडून खरेदी करतो. त्यामध्ये कुठलेही टेंडर नाही आणि कुठल्याही ठेकेदाराकडून खरेदी करत नाही. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनकडून आपण हे थेट खरेदी करतो आणि त्यामध्ये एम.एल.ओ. हे स्वतः स्वच्छता निरिक्षक जाऊन घेऊन येतो आणि आवश्यकतेनुसार सर्व स्वच्छता निरिक्षकांना त्याचे वाटप करण्यांत येते.

**मिलन पाटील :-**

जे धुर मारायचे पंप होते, त्याची आपण थोडक्यात माहिती द्या की, गेल्या वेळेला आपण किती पंप खरेदी केले होते आणि आता सद्य स्थितीत किती चालू आहेत? पुन्हा आणखीन आमच्या निदर्शनास असे आलेले आहे की, पुन्हा आपण पंप खरेदी केलेले आहे आणि जी गाडी आपण फवारणी करतो ती गाडी कमीत कमी ५० पंपाचे काम ती एक गाडी करते. तर ती गाडी किती दिवस बंद होती आणि चालू केली तर ती चालू कधी केली? ह्याचे मला आपण उत्तर द्या.

**डॉ. बावस्कर :-**

आपण किती पंप खरेदी केले आणि केव्हा केले किंवा आपण कुठले औषधे खरेदी केले ह्याचा सविस्तर लेखी अहवाल आपल्याला प्रत्येकाला मी देतो.

**मिलन पाटील :-**

आपण असे सांगा. आम्हांला अगदी करेक्ट पाहिजे असे काही नाही. आपण मागच्या गेल्या वर्षी साधारणतः १००-२०० असे जे काही पंप खरेदी केले ते आता चालू आहे किंवा नाही?

**डॉ. बावस्कर :-**

काही पंप चालू आहेत व काही पंप बंद आहेत. त्यांना आपण दुरुस्तीची कारवाई केलेली आहे. त्याचे सामानसुद्धा आपण मागवलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

आज परिस्थितीमध्ये आपल्याकडे किती पंप चालू आहेत?

**डॉ. बावस्कर :-**

आजच्या परिस्थितीमध्ये आपल्याकडे १०० ते १२५ पंप चालू आहेत.

**मिलन पाटील :-**

पण आपण हे जे पंप खरेदी केले ते मालाडला जी कंपनी आहे त्यातून डायरेक्ट खरेदी केले का सबडिलरकडून घेतले? कारण असे आहे की, आपण पंप घेतल्या घेतल्या ते खराब झाले. आपण जे पंप खरेदी केले ते सबडिलरकडून खरेदी केले आणि ते आपल्याला सबडिलकरकडून पंप बरोबर मिळाले नाही. म्हणून ते महिन्याभराच्या आतमध्येच नादुरुस्त अर्धे पंप झाले आणि उरलेले पंप जवळजवळ दोन महिन्याच्या आतमध्ये खराब झाले. तर ह्याचे कारण काय? म्हणजे मालाडला जी कंपनी आहे तेथून आपण खरेदी केले की, सबडिलरकडून खरेदी केले?

**डॉ. बावस्कर :-**

एस.पी.चे जे आहे त्यांच्याकडून खरेदी केलेले आहे.

**मिलन पाटील :-**

मालाडला जे अमिरिकन स्प्रिंग तेथून आपण डायरेक्ट त्यांच्याकडून पंप घेतलेले नाही असे आमच्या निदर्शनास आलेले आहे. आपण सबडिलरकडून घेतलेले आहे. ही परिस्थिती बरोबर आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, यामध्ये आपल्याला कंपनीकडून डायरेक्ट खरेदी करता येत नाही. ज्या शासकीय कंपन्या असतात किंवा ज्या नामांकित कंपन्या असतात म्हणजे इंडियन ऑईल कॉर्पोरेशन किंवा अशा ज्या मोठमोठ्या कंपन्या असतात आणि आता फक्त त्याच अशा प्रकारचे उत्पादन करु शकतात.

**मिलन पाटील :-**

एक पंप मी स्वतः घेतलेला आहे. अमेरिकन स्प्रिगकडून माझ्या नावाने, मिलन पाटीलच्या नावाने जर ते मला एकट्याला देऊ शकतात तर महानगरपालिकेला देऊ शकत नाही का?

**डॉ. बावस्कर :-**

देऊ शकतात.

**मिलन पाटील :-**

मग आपण तेथून खरेदी का केली नाही?

**सुधीर नाकाडी :-**

खरेदी करण्याची प्रोसिजर आहे. शासनाने खरेदी करण्याकरिता जी.आर. काढून दिलेला आहे की, शासनाची खरेदी कशा प्रकारे करायची असते. ती खरेदी जाहिर निविदा मागवूनच खरेदी करायची असते. अशी कुठलीहि कंपनी किंवा दुसरी कंपनी असू दे. तेच उत्पादन जर दुसरी कंपनी उत्पन्न करत असेल तर त्यात स्पर्धा ही व्हायलाच पाहिजे. ते कमी दराने खरेदी करता यावी याच्यासाठी जाहिर निविदा मागवून त्या निविदेतून जो कमीत कमी दर येईल तो दर आपण स्विकारला पाहिजे. अशा प्रकारची प्रोसिजर आहे. त्यानुसारच आपण खरेदी करतो.

**मिलन पाटील :-**

जर चांगला माल डायरेक्ट कंपनीकडून मिळत असेल तर? तुम्ही दोन कंपनीकडून निविदा मागवा. सबडिलरकडून कशाला मागवता?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण जाहिरात देतो. ते टेंडर मग दहा कंपन्यांनी भरावे. ज्यांनी टेंडर भरले त्यांचेच पास केले असेल. हे दोन वर्ष अगोदरची गोष्ट आहे. त्यावेळी पंप आणले आहे. पण आपण जाहिरात देतो आणि जाहिरात दिल्यावर टेंडर हे कोणतीही कंपनी भरु शकते आणि त्यावेळी त्यांनी टेंडर भरले नसेल किंवा आपला माणूस त्यांच्यापर्यंत पोहोचला नसेल की, तुमच्या कंपनीचे पंप चांगले आहेत. तुम्ही तुमचे टेंडर पाठवा. ज्यांचे लो कोटेशन असेल त्यांचे टेंडर पास केले.

**सुर्यकांत भोईर :-**

तिथे महापालिकेचे अधिकारी जाऊ शकतात.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपल्याला जायची जरुरत नाही. तो ठेका कमीत कमी दराचा ज्याने भरला असेल त्याला द्यायचा आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, जे के ॲथरिन औषध आहे ते कसे?

**डॉ. बावस्कर :-**

ते आपण ह्यावर्षी मागविले नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्याला चांगला माल पाहिजे. त्याची शाश्वती आपण घ्यायची नाही. वाईट आले तरी चालेल. म्हणजे टेंडर आपण काढायचे, पण मेहनत आपण करायची. मग ते कसेही येऊ द्या. माल चांगला पाहिजे अशातला भाग नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी असे नसते.

**सुर्यकात भोईर :-**

होम डिलीव्हरी तुम्हांला पाहिजे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आज आपल्याकडे एवढ्या गाड्या आहेत. त्या गाड्या चालतात का? सहा महिन्यामध्ये रिपेअरला जाते. त्या गाड्या चांगल्या टाटा कंपनीच्या आहेत आणि कधी, कुठे, काय बिघडू शकते त्याची आपल्याला कल्पनाच नसते.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपला फिरता दवाखाना कुठे आहे? डॉक्टर साहेब, आता विषय निघाला म्हणून मी काढतोय.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य प्रभाग १, २, १८ आणि १९ विषय कसा डायव्हर्ट होत चालला आहे. आधी सन्मा. सदस्य मिलन पाटील ज्यावेळेला बोलता होते त्यावर डॉ. बावस्कर आरोग्य अधिकारी ह्यांनी खुलासा केला. सुरुवातीला विषय आला नालेसफाईवर. सन्मा. आरोग्य अधिकाऱ्यांचे मत असे आहे की, नालेसफाईचे जे काम आहे ते फक्त पावसाळ्याच्या चार महिन्यापुरतेच करतोय. त्यांचा निष्कर्ष असा आहे की, हे काम आपण जर संपूर्ण वर्षभराची मोहिम चालू ठेवली तर ह्याच्यावर कुठेतरी अंकुश बसेल. राहिला प्रश्न जी मोहिम आपण चार महिन्यासाठी राबवितो. त्या मोहिमेवरच सर्वप्रथम प्रश्नचिन्ह आहे. दिलेले काम हे चांगल्या पद्धतीने होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आमच्या हायवे प्रभागामध्ये पावसाळ्याच्या अगोदर ज्यांना नालेसफाईचे टेंडर दिले असेल त्याचे नालेसफाई हे झालेले नव्हते आणि त्याला टेंडरचे पेमेन्ट पोहोच झालेले होते. तर कोणी सही केली?

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर साहेब बोलतात व डॉ. बावस्कर साहेबांनी एक मुद्दा उपस्थित केला की, मी त्या मुद्याच्या अंतर्गत विचारते की, आपल्याकडे पक्के नाले किती आणि कच्चे नाले किती?

**मिलन पाटील :-**

तुम्ही फार वर्षापुर्वीचे सांगितले पण तुम्हांला येथे येऊन एकच वर्ष झाले.

**प्रभात पाटील :-**

ते माहिती देतात तोपर्यंत मी विचारते जे १०० पंप चालू आहेत ते १०० पंप कुठे काम करतात?

**राजकुमार कांबळे :-**

मॅडम लिस्ट फार मोठी आहे.

**रिटा शाह :-**

आपण मला आकडे द्या.

**राजकुमार कांबळे :-**

आकडे दिले तरी ५० नावे असतील.

**रिटा शाह :-**

१० पक्के २० नाले कच्चे अशी माहिती द्या.

**राजकुमार कांबळे :-**

त्याची यादी आहे.

**रिटा शाह :-**

यादी आहे तर ते मोजा. मोजायला किती वेळ लागते आणि तुम्ही माईकवर उत्तर द्या तुम्ही असेच मोघम उत्तर देता त्यामुळे माझे बोलणे टेपिंग होते आणि तुमचे काहीच टेपिंग होत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह नाल्याची जी व्याप्ती आहे त्याच्यामध्ये मिरा गाव ते पेणकर पाडा ह्याचे त्यांनी एक झोन केलेला आहे. त्याच्यामध्ये जे पक्के आणि कच्चे नाले आहे त्याचे विवरण त्यांनी दिलेले आहे, काशि, चेणा आणि घोडबंदर.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, माझा बोलायचा अर्थ असा नाही, त्यांच्याकडे एवढे एस.आय आहेत आणि ते एवढे जुने आहेत. त्यांच्याकडे एक अंदाजा असेल आता अजित पाटील साहेबांना विचारले तर अंदाजे देतील.

**प्रभात पाटील :-**

अंदाज कशाला, त्यांच्याकडे ऑल रेकॉर्ड पाहिजे, सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर माहिती समोर पाहिजे. हे संपूर्ण मिरा भाईंदरचे काम करतात त्यांना ह्याची संपूर्ण माहिती पाहिजे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, ही एवढी मोठी लिस्ट आहे म्हणून त्याला वेळ लागेल असे उत्तर सभागृहात चालत नाही. कितीही वेळ लागला तरी आम्ही येथे चार दिवस बसायला तयार आहोत.

**हॅरल बोर्जीस :-**

त्या लिस्टचे वाचन करण्यात यावे.

**राजकुमार कांबळे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय.

**प्रभात पाटील :-**

अजित पाटील साहेब तुम्हीही येथे बसला आहात आणि तुम्हाला त्याची कल्पना असेल आपणही तेथून बोला.

**मिलन पाटील :-**

त्यांना विचारल्यावर ते बोलतील.

**प्रभात पाटील :-**

मी विचारते म्हणून तरी तुम्ही बोला. हे एस.आय जर उत्तर देत नसतील तर तुम्ही पुर्वी नगरपरिषदेमध्ये फार चांगले काम केले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

आरोग्याचे अधिकारी श्री. कांबळे हे आपल्याला माहिती देत आहेत, ती कृपया ऐका.

**राजकुमार कांबळे :-**

मिरा गावं ते पेणकरपाडा या विभागात खालील नाले आहेत. सृष्टी रोड ब्लॉक कंपनी ते सृष्टी सेक्टर एकपर्यंत, चेक नाका रिक्षा स्टँडयेथील नाका ते अमीत पॅलेसपर्यंत, महाजनवाडी मिरागावठण.

**रिटा शाह :-**

हे कच्चे नाले आहेत, का पक्के नाले आहेत.

**राजकुमार कांबळे :-**

हे जे पक्के नाले आहेत ते पक्के लिहिले आहेत व जे कच्चे नाले आहेत ते तिथे कच्चे नाले असे लिहिले आहे आणि आता प्रथम मी पक्के नाले वाचून दाखवतोय, बॉम्बे मोटर्स गावठण ते प्रसाद हॉटेल हायवे मटण मार्केट गोदावरी हॉटेलपर्यंत, गावठण गावदेवी मंदिरपर्यंत, रेड हाउस ते जकातनाका चार हायवे सम्राट हॉटेलपर्यंत, मिरा सोसायटी ते एम.आय.डी.सी. मिराधाम ते मोरेश्वर पाटील ह्यांच्या घरापर्यंत, कोंबडी गल्ली ते गंगानगर कच्चानाला मिरा गावं, दिल्ली दरबार मुन्शी कंपाउन्ड झंकारवाडी कच्चानाला........

**रिटा शाह :-**

साहेब, मला आता पुढची लिस्ट वाचून दाखवू नका. पण माझ्या बोलण्याचा अर्थ एवढाच आहे की, मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये फक्त कच्चे नाले कारण डॉ. बावस्कर साहेबांनी त्याचे गाळ का काढले नाही त्याचे आपल्याला असे उत्तर दिलेले आहे की, ते कच्चे नाले आहेत म्हणून गाळ खालून निघतच राहते म्हणून आपण संपूर्ण गाळ काढू शकत नाही. आपल्याकडे जे पक्के नाले आहेत त्याच्यामधूनही गाळ निघालेला नाही. असा रिपोर्ट आपल्याकडे आहे आणि तो रिपोर्ट सादर झालेला आहे. एकतर तो रिपोर्ट खोटा आहे किंवा आपण खोटे आहात नाहीतर प्रशासन खोटे आहे. पक्क्या नाल्यातून ही गाळ निघालेला नाही असे रिपोर्ट तुम्ही मागच्या चर्चा दरम्यान आमच्याकडे सादर केलेले आहे, मग त्याचा अर्थ त्या ठेकेदाराने ठेका घेतला ऑन दि पेपर, प्रॅक्टीकल कुठेही काम झालेले नाही तो नाला साफ केलेला नाही म्हणून तो गाळ एवढ्या वर्षापासून तिथे दिसतो पक्क्या नाल्यामध्ये मी कच्चा नाल्याची

गोष्ट करत नाही. कच्चा आणि पक्का नाला ह्याच्यातून मिसगाईड करू नका, डॉ. बावस्कर साहेब, मी तुम्हाला सॉरी बोलते पण आमच्याकडे पक्के नालेसुद्धा आहेत आणि ते ही तुंबलेले आहेत.

**डॉ. बावस्कर :-**

माझा आपल्याला कुठेही मिसगाईड करण्याचा उद्देश नाही पक्के नाले ज्या नाल्याला खाली बेड असते ज्या नाल्याला खाली पी.सी.सी केलेले असते. तो खरा पक्का नाला असतो.

**रिटा शाह :-**

आपल्याकडे पी.सी.सी केलेला एकही नाला नाही का? मी असा प्रश्न विचारते, आपल्याकडे पक्के नालेदेखील आहेत. मिरा भाईंदर क्षेत्रात तिसऱ्या टर्मला महानगरपालिका झालेली आहे. ह्याच्यामध्ये नुसते ग्रामपंचायत सारखे नुसते कच्चे नाले आणि नुसती कच्ची गटारे आमच्याकडे नाही.

**डॉ. बावस्कर :-**

मी तसे म्हणत नाही. मी मॅजोरिटी नाले म्हणतो.

**रिटा शाह :-**

मी तुमचा दोष काढतच नाही. तुम्ही समजून घ्या की, तुम्ही जो कच्चे नाल्याचा बहाणा घेउन गाळ काढला नाही म्हणून तुम्ही जे सांगतात, असे तुम्ही प्रशासनातर्फे उत्तर देता, तुम्ही समजून घ्या, जो कच्चा नाला आहे त्याचे आम्ही समजून घेउ की गाळ निघाला नाही. पण जो पक्का नाला आहे आणि त्याच्यामधून गाळ निघाला नाही त्याची जबाबदारी कोणाची? तुम्ही घेता का ती जबाबदारी तुमची जबाबदारी आहे.

**मिलन पाटील :-**

सौ बात की एक बात, आपल्या प्रशासनाची मिस्टेक काय झाली आहे, हे मी तुमच्या निर्दशनास आणू देतो. ती टेकनिकल मिस्टेक आहे.

**रिटा शाह :-**

हे आपण इन्टरअप करू नका, आपण टेकनिकल तुम्ही नंतर द्या. तुम्ही मला सांगा पक्के नाले कसे साफ झाले नाही.

**डॉ. बावस्कर :-**

पावसाळ्यापूर्वी आपण सर्व नाले साफ केलेले आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, एवढी मोठी बी.एम.सी. आहे तिथेही पावसाळ्यापूर्वी साफसफाई असते. वर्षातून चार वेळा तिथेही साफसफाई होत नाही.

**डॉ. बावस्कर :-**

मॅडम आपण असे करू या की, आपण इतर शहरांनाभेटी देवू या आणि आपण मुंबईला जावू या. आपण जर असे सांगत असाल तर आपण इतर शहरांना भेटी देवू या.

**रिटा शाह :-**

तुम्ही जर कच्चा नाल्याचे सांगत असाल तर कच्च्या नाल्यामध्ये गाळ आम्ही समजून घेवू. पक्का नाल्यामध्ये १०-१० वर्ष झाले आणि ते मी सांगत नाही, तर तुमचा रिपोर्ट बोलतोय. आतापर्यंत मी बोलले नाही. मागच्या स्थायी समितीमध्ये जो रिपोर्ट सादर झाला त्याच्यावरुन मी बोलते आहे. तुमचेच एस.आय आणि तुमच्याच अधिकाऱ्यांनी तो रिपोर्ट दिलेला आहे.

**डॉ. बावस्कर :-**

ज्यांचे काम नालेसफाईचे आहे किंवा ज्यांचे काम सुपरविझनचे आहेत त्यांनीच हे रिपोर्ट दिलेले आहेत म्हणजे त्यांनीच हे रिपोर्ट दिलेले आहे म्हणजे ती कामे त्यांनीच केलेली आहेत.

**रिटा शाह :-**

साहेब, मी डॉ. बावस्कर साहेबांना एलिगेशन लावतच नाही. बावस्कर साहेब तुम्ही मला बोलू द्या, तुम्हाला येथे येउन दोन वर्ष झाले आहे आणि हा जो प्रकार झालेला आहे तो दोन वर्षाचा नाही, मागील पाच-सहा वर्ष झाले हे ठेके दिले त्याच्यामधून काम झाले नाही असे पुर्णपणे स्पष्ट होते. कारण तुमच्या विभागप्रमुखांनी, एस.आय ने जो रिपोर्ट दिलेला आहे त्याच्यामध्ये मेन मुद्दा तो ठेकेदार. त्या ठेकेदाराने ऑन दि पेपर काम घेतले आणि प्रॅक्टीकल काम घेतले नाही आणि त्याने प्रॅक्टीकल काम केले नाही व त्यावेळेचे एस.आय चीफ ऑफ दि डिपार्टमेंट एस.आय ह्यांनी दिलेले खोटे रिपोर्ट त्याच्यावरून ते बिल पेमेन्ट झालेले आहे आणि आज ह्या शहराचे न्यायची परिस्थिती निर्माण झालेली आहे. मी डॉ. बावस्कर साहेबांना दोष देत नाही. तुम्ही येउन फक्त दोन वर्ष झाले अजून तुम्ही समजा, की मी काय सांगते, मेन मुद्दा त्यावेळेचे एस.आय आणि विभाग प्रमुखांनी दिलेला खोटा रिपोर्ट की, नालेसफाई व्यवस्थित झालेली आहे, चुक सांगते मिरा भाईंदर शहरामध्ये म्हणून आज हा विषय

उपस्थित झालेला आहे की, ते नाले आमचे पक्के आहेत व त्यातूनही दहा दहा वर्ष झाले की गाळ निघालेले नाही, ते समोर दिसते.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

दहा-दहा वर्ष झाले, तर आपण कुठे गेल्या होत्या दहा वर्ष .

**रिटा शाह :-**

कोण कुठे गेले होते, हे मी तुम्हाला विचारत नाही. प्रशासनाने असा रिपोर्ट पहिल्यांदा ठेवला आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मी सांगतो येत्या वर्षात नालेसफाईचे पुन्हा टेंडर काढतो.

**रिटा शाह :-**

मी ह्यांना विचारत नाही, सभापती साहेब तुमच्याकडून रूलिंग आली पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्या सभेला सुरूवात होण्याअगोदर सदस्य अशोक पाटील ह्यांनी थोडेसे विषयामध्ये बदल घडवून आणले व मा. सभापती साहेबांनी त्यांची सूचना मान्य केली. आता प्रश्न असा आहे ह्या प्रश्नावर चर्चा करुन आपल्याला त्याच्यावर निर्णय घ्यायचा आहे. येथे अहवाल १,२,१८ आणि १९ चे वाचन केले आणि अजून बाकींच्या प्रभागाचे वाचन आहे. त्याचे कृपया वाचन करा. त्याच्यावर तुमचे काय मत आहे ते मांडा, ज्या त्रुटी असतील त्या सांगा आणि त्याच्यावर काय निर्णय घ्यायचा तो सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे. आपण जर इंडीव्हयूजव्हली प्रत्येकजण चर्चा करत बसलो तर प्रत्येक सदस्य हा कुठल्या ना कुठल्या प्रभागाशी निगडीत आहे.

**प्रभात पाटील :-**

मला असे वाटते की, ह्या चार प्रभागांचा निर्णय होत असताना, वाचन होत असताना, संपूर्ण शहराचा विचार करून सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडमने ठराव मांडलेला आहे आणि सभापती साहेब तुम्ही तेव्हा कदाचित हजर नव्हता तर त्यांनी पुन्हा एकदा ठराव मांडावा.

**रिटा शाह :-**

तो ठराव मी तुम्हाला लिहून देते. ठराव झालेला आहे पण चर्चा चालू की तसे जे ठेकेदार आहेत त्यांनी ऑन दि पेपर कामे घेउन आपले पक्के नाले व कच्चे नाल्याबाबत मी डॉ. बावस्कर साहेब तुम्ही आरोग्य विभागाचे फार काम करून आला आहात व तुमच्या अनुभवाच्या हिशोबाने तुम्ही आम्हाला उत्तर दिले की, कच्च्या नाल्यामधून गाळ निघून शकते. पण पक्के नाल्यामध्ये पाच पाच वर्ष झाले असे भरलेले दिसतात. मागील चर्चा दरम्यान लिगली चर्चा नव्हती, तेव्हा रणखांब साहेबांचे कौतुक जाहिर केले होते की, मी माझ्या पहिल्यांदा जन्माच्या हिशोबात अशी परिस्थिती बघितली आहे, हे प्रशासनाने कबूल केले आहे, त्यानंतर मॉरस रॉड्रीक्स साहेब मी येथे बोलायला उभी राहिली आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त सो.) :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने, मी येथे एक खुलासा करु इच्छितो की, ह्याच्यामध्ये जे वक्तव्य केले आहे ते सर्व रिपोर्टवर आधारीत आहे आणि तुम्ही जे बोलता उपायुक्त साहेबांनी असे केले, तसे नाही.

**रिटा शाह :-**

तुम्ही आम्हाला चांगली दिशा दिली आहे, तुम्ही आम्हाला चांगले वळण दिले आहे. तुमचे आम्ही अभिनंदन केलेले आहे.

**अशोक पाटील :-**

साहेब प्रशासनाने, तुमच्याच अधिकाऱ्यांनी हे रिपोर्ट दिलेले आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त सो.) :-**

अभिनंदन करा त्यात दुमत नाही पण त्याच्याबद्दल जे विभागप्रमुखांचे रिपोर्ट आहेत तेच समोर केले आहे. त्यामुळे रोष देउन आणखीन वेगळे अर्थ घेउ नका.

**रिटा शाह :-**

वेगळा विषय मांडत नाही, त्या रिपोर्टवरूनच मी बोलते. रॉड्रीक्स साहेब बोलतात की, आपण दहा वर्ष कुठे गेला होता तर आम्ही कुठेही गेलो नव्हतो. आम्ही दहा वर्ष येथेच होतो. साहेब आता जो रिपोर्ट सादर झाला असा रिपोर्ट दहा वर्षात सादर झाला नाही, तर बोलायचा प्रश्नच कुठे येतो. मीदेखील होते आणि रॉड्रीक्स साहेब ही होते.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, अगोदरचे जे रिपोर्ट आहे ते सगळे रिपोर्ट आम्हाला पेश करा, वाचून दाखवा. सगळ्यांमध्ये माझ्या मते हीच परिस्थिती असेल. सर्व प्रभागात चौदा झोनमध्ये हीच परिस्थिती असणार. संपूर्ण जे रिपोर्ट्स आहेत त्याचे सभागृहात वाचन करावे आणि तुमचे जे रिमार्क्स आहेत त्याचे आम्हाला वाचन करून दाखवावे व त्याच्यानंतर आपण ह्याच्यावर निर्णय घेणार आहोत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, आता जे आपण चार प्रभागाचा अहवाल चर्चेकरिता घेतला आहे त्याच्यावर काय कार्यवाही करायचे ते पहिले ठरवा.

**सुर्यकांत भोईर :-**

कार्यवाही काय करणार आहोत ते आपण ठरवणार आहे. पहिले चर्चा होउ द्या, तुमच्या प्रभागाचे झाले म्हणून काय झाले.

**अशोक पाटील :-**

त्याच्यावर निर्णय आपण घ्यायचा आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिव साहेब, पुढच्या प्रभागाच्या अहवालाचे वाचन करावे.

(प्र. सचिवांनी प्रभाग क्र. ५, १६, १७, २१ व २६ / ३, ४, २० / ६, ७, ८, ९, २२, २३, २४ व २५ / १०, ११, १२, १३ / १४, १५ ह्या प्रभागाच्या निष्कर्षांचे वाचन सभागृहासमोर केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

प्रत्येक प्रभागामध्ये जे झोन पाडले होते त्याच्या अहवालाचे वाचन करण्यात आलेले आहे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, घोडबंदर येथे जी उघाडी आहे आणि आता तो नाला झालेला आहे.

**प्र. सचिव :-**

उपायुक्त शेख साहेब ह्यांनी दिलेल्या प्रभागाचे वाचन करायचे बाकी आहे.

**अशोक पाटील :-**

त्यांना सर्व अहवाल वाचू दे नंतर आपण त्याच्यावर चर्चा करू.

**प्र. सचिव :-**

अहवालाचे वाचन करण्यात आले.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेब, आपण ही जी मोहिम राबिवली, ही मोहिम आता राबवल्याने संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियाना करीता हे आपले कर्मचारी म्हणजे महानगरपालिकेचे अधिकारी आहेत, कर्मचारी आहेत हे सगळे आपण या मोहिमेला लावले होते, ते गाडगेबाबा स्वच्छता अभियानकरिता लावले हाते की डेंग्यूची साथ आली म्हणून लावले होते, हा एक प्रश्न म्हणजे त्याच्यातच हे झाले होते. तर माझा असा प्रश्न आहे की, आपण जर ते संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान लावले होते तर जी डेंग्यूची साथ होती म्हणजे जी आता परसली आणि जे पेपरमध्ये आले, तर त्याबाबतीत आपण जर एवढा खर्च केला, स्वच्छतेकरिता, तर तो खर्च आपला वाया गेल्यासारखा आहे. दुसरी गोष्ट, आपण आपले एवढे कर्मचारी लावून त्यांचा जो अहवाल घेतलेला आहे ह्या अहवालाप्रमाणे जर आपण चाललो तर अजून आपल्याला हे करण्याकरिता खर्च खूप आहे. महापालिकेतर्फे हे जे ठेकेपद्धतीने केले तर मला वाटते ह्याच्यापुढे ठेका पद्धत बरोबर चालणार नाही. कारण हे देणे ही योग्य नाही कारण आपण ठेक्यावाल्याला काय बोलू शकणार? आपले जर महानगरपालिकेचे कर्मचारी असतील तर आपण त्यांना ससपेन्ड देखील करून शकतो की हे काम बरोबर झालेले नाही. पण आपण जर ही ठेका पद्धती ठेवली तर ते आपल्याला फार खर्चीत आहे आणि ह्याचा उपयोग शहराला होत नाही आणि स्वच्छता पाहिजे तशी होत नाही. तसेच, का आता जे झाले, जसे बावस्कर साहेबांनी सांगितले की कच्चे नाले आणि पक्के नाले. त्या कच्च्या आणि पक्क्या नाल्याकरिता आपण जे अगोदर पावसाळ्यापूर्वी नाले सफाईचे जे टेंडर काढले होते. त्यामध्ये आपण एक जे.सी.बी. आणि पोकलन ह्या दोन गोष्टी आपण मागवल्या होत्या आणि त्या कायदेशीर तुमच्याकडे पाहिजेत. हे जर असले तरच आम्ही तुमचे टेंडर एक्स्पेक्ट करू. ते टेंडर ज्यांनी घेतले तर पोकलन हे हायड्रॉलीक प्रेशर त्याला असते, जे.सी.बी. ला हायड्रॉलीक प्रेशर असते तर ह्या हायड्रॉलीक प्रेशरने खालचे पी.सी.सी. केलेले असते व जे ड्रायव्हर असतात ते तज्ञ नसतात की ह्याचे पी.सी.सी. केलेले आहे आणि आपल्याला ते व्यवस्थित काढायला पाहिजे किंवा नाही ते काहीच बघत नाही. तो पोकलनने जो पंजा मारतो हा हायड्रॉलीक पंजा त्याला बसल्यानंतर तुमची कितीही मजबूत पी.सी.सी. असली तरी ती त्या पंजाने उखडून निघते आणि ती

पी.सी.सी उखडून निघाल्यानंतर तुमच्या नाल्याची संबंध वाट लागते तर तुम्हाला माहिती आहे जिथे पक्के नाले असतील तिथे पोकलन आणि जे.सी.बी. चा उपयोग न करता, गमबूट घालून माणसे खाली उतरवून जे आम्ही ग्रामपंचायत असताना जसे कामे करत होतो. जेव्हा मी ग्रामपंचायतीचा सदस्य होतो तेव्हा अशीच मोहिम घेउन श्री. रमेश म्हात्रे, श्री. अजित पाटील, श्री. श्रीकांत मोरे हे त्यावेळेला होते, त्यावेळेला आम्ही गमबूट घालून फावड्याने जो कचरा होता तो कचरा आम्ही वेगळा काढत होतो. अशापद्धतीने जर पक्के नाल्याचा गाळ काढला तर ते पक्के नाले टिकतील व त्याला स्लोप मिळेल व त्याचे कामदेखील व्यवस्थित होईल. ह्याच्यापुढे काम करताना ह्याची दक्षता घ्यावी की, त्या पक्क्यानाल्याला जे.सी.बी. आणि पोकलन वापरायचे नाही. ह्याच्यापुढील जी ठेकापद्धत आहे त्याचा असा गंभीर अहवाल आल्यामुळे ठेकापद्धत बंद करावी अशी मी सूचना करतो. ह्याच्यावर फार चर्चा झालेली आहे तरी अध्यक्ष महोदयांनी ह्याच्यावर गंभीर विचार करावा आणि ह्याच्यापुढे जी ठेकापद्धत आहे ती बंद करायचे, आपण मार्गी लागून जायचे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय साहेब, आमच्या हायवे पट्टयामध्ये पावसाळ्यापुर्वी ज्या ठेकेदाराला तुम्ही नालेसफाईसाठी ठेका दिलेला होता. त्याचे पेमेन्ट झाले. पण त्याने नालेसफाई केलेली नव्हती. त्या ठेकेदाराचे आपण मला नाव सांगू शकता का?

**मा. सभापती :-**

कुठला ठेका?

**सुर्यकांत भोईर :-**

पावसाळ्यापूर्वी नालेसाफसफाईचे जे टेंडर निघाले होते ते टेंडर दिल्यानंतर त्यांनी साफसफाई अजिबात केली नाही व त्याला टेंडरचे पैसे दिलेले आहेत.

**मा. सभापती :-**

अशी माहिती आपल्याकडे आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

होय, कारण माझ्या वार्डात संपूर्ण हायवेपर्यंत अशी साफसफाई केलीच नाही.

**मा. सभापती :-**

मग तुम्ही असे विचारा, माझ्या प्रभागामध्ये कोणी नालेसफाई केली, कोणता ठेकेदार होता, ही माहिती तुम्ही मागा.

**अशोक पाटील :-**

तुमच्या प्रभागात नालेसफाई झाली नाही म्हणून तर तसा अहवाल आला.

**सुर्यकांत भोईर :-**

नालेसफाई झाली नाही म्हणून ज्याला टेंडर दिले त्या कंपनीचे नाव काय? मी पावसाळ्यापुर्वीचे बोलतोय, पावसाळ्यानंतरचे नाही. पावसाळ्यापूर्वी नालेसाफसफाईचे टेंडर कोणाला दिले होते?

**अशोक पाटील :-**

वॉर्डव्हाईज गटनिहाय साफसफाई त्याच्यासाठी एवढे आपण करोडो रूपये खर्च केला तरी देखील नालेसफाई झाली नाही त्याच्याकरिता आपण ही जी मोहिम काढली व त्या मोहिमेचे जे रिमार्क्स आलेले आहेत आणि ते हे भयानक रिमार्क्स त्यासाठीच आलेले आहेत की नालेसफाई झालेली नाही म्हणजे आपण, प्रशासन आरोग्य विभागाकरिता करोडो रूपये खर्च करतो आणि आज या आरोग्य विभागासाठी आपल्या प्रशासनातर्फे, बजेटमध्ये सोळा करोडची तरतुद आहे, का तर पावसाळ्यापुर्वी नाले सफाईकरिता आपण चाळीस लाख रुपये खर्च केले असतील. त्याच्यानंतर पुन्हा जो साफसफाईचा ठेका होता तो रेग्यूलर चालू होता. त्याला एक महिन्याची मुदत वाढवून दिली. त्याच्यामध्ये जवळजवळ वीस लाख रूपये खर्च केले असतील. तसेच, गटनिहाय आपण जे चौदा गट निर्माण केले, गटनिहाय साफसफाईकरिता त्यांचे जवळजवळ सात करोड रुपयाचा ठेका काढला आणि ह्या तीन महिन्यामध्ये जवळ जवळ दोन करोड रुपये हे ह्या चौदा प्रभागामध्ये आपण साफसफाईकरिता खर्च केले आणि तरी देखील ह्या शहरामध्ये आज ही भयान परिस्थिती आणि हे आपले अधिकारी, गट अधिकारी, प्रभाग अधिकारी आहेत ह्या सर्व अधिका-यांचे याबाबत रिप्लाय आलेले आहे. ते अतिशय असे भयानक रिप्लाय आहेत ह्याचा अर्थ आपण ह्या आरोग्य विभागावर करोडे रुपये खर्च करून ते गटारामध्ये गेल्यासारखे झालेले आहे. तर आपण हे जे खर्च करतो त्याची नालेसफाई केलेली नाही, कच-याचे ढीग साचलेले आहेत, सगळीकडे मच्छरांचा सुळसुळाट झालेला आहे, डेंग्यू सारख्या साथीचा देखील प्रादुर्भाव झालेला आहे तर असे हे भयानक रिपोर्टस् असताना अध्यक्ष साहेब ह्याच्यावर संबंधित अधिका-यांवर काय कार्यवाही केलेली आहे, आपण या खास आरोग्य विभागाकरिता विशेष कार्यकारी

अधिकारी डॉ. बावस्कर साहेबांची नेमणूक केलेली आहे. त्यांनी कधी या संबंधित विभागाची पाहणी केली का? त्यांनी कधी या प्रभाग अधिकाऱ्यांना शोकॉज नोटीस बजावल्या होत्या का? आज हा प्रश्न स्थायी समितीसमोर चर्चेला आल्यानंतर ही त्यांची जिम्मेदारी आहे असे डॉ. बावस्कर साहेबांचे म्हणणे आहे का? त्यांनी कधी या संदर्भात दखल घेतली होती का? आज करोडो रूपये आपण ह्याच्यावर खर्च करतोय, याबाबत डॉ. बावस्कर साहेबांनी खुलासा करावा की या संदर्भात, तुम्ही कधी म्हणता की त्या प्रभाग अधिकाऱ्यांना सूचित केले का?

**सुर्यकांत भोईर :-**

माझ्या प्रश्नाचे उत्तर अजून दिले नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटीलजी ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे की, संबंधित प्रभाग अधिकाऱ्यांना आपण सूचित केले का की, प्रभागनिहाय जी साफसफाई चालू आहे त्या ठेकेदारांविषयी आपल्याला बोलायचे आहे की त्या प्रभागात काम करतात त्यांच्या प्रभागाच्या अधिकाऱ्याला बोलायचे आहे.

**अशोक पाटील :-**

साहेब, आता डॉ. बावस्कर साहेबांनी मगाशी सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडमच्या मुद्दयावर खुलासा करताना सांगितले की, हे प्रभाग अधिकाऱ्यांनी जे रिपोर्ट दिलेले आहे आणि त्यांच्यावर नियुक्त केलेले आपले जे अधिकारी आहेत त्यांना देखील ते पाहणी दौऱ्यामध्ये आढळून आले आहे. तर त्याचे असे म्हणणे की ती प्रभाग अधिकाऱ्यांची जिम्मेदारी होती तर त्यांनी ह्या संदर्भात त्यांच्यावर कधी देखरेख केली आहे का? डॉक्टर बावस्कर साहेबांना आरोग्य विभागाकरिता आपण नेमलेले आहे तर त्यांनी कधी त्यांची माहिती घेतली का? त्यांनी त्यांना कधी शोकास नोटीस बजावली होती का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटीलजी विषय असा झाला की, जेव्हा स्वच्छता अभियान या ठिकाणी राबवले तेव्हा डेंग्यूची, मी मगाशी जे पत्र वाचून दाखवले. तेव्हा आपण आयुक्त साहेबांकडे गेला होता. ते पत्र असे वाचले की, डेंग्यूचा एक ऋग्ण दगावला आणि डेंग्यूचे प्रभावित काही नागरिक झाले आणि त्या अंतर्गत स्वच्छता अभियान राबविण्याची आपली फेरी आली, त्या फेरीच्या अनुषंगाने आपण सर्व अधिकाऱ्यांना, उपायुक्त साहेब ह्यांनी जबाबदारी दिली. प्रभाग अधिकारी, त्यांच्या अखत्यारिमध्ये असलेले सर्व अभियंते, एस.आय आणि त्यांच्याबरोबर उपायुक्त, सिटी इंजिनिअर, पाणी पुरवठा अधिकारी या सर्वांना मिळून विभागव्हाईज रस्त्यावर उतरविले. त्यावेळेला प्रभाग अधिकाऱ्यांनी आणि त्यांचे असलेले इंजिनिअर ह्यांनी सर्वांनी एक रिपोर्ट तयार केला, जे त्यांना त्या ठिकाणी वस्तुनिष्ठ आढळलेले आणि ते रिपोर्ट केल्यानंतर आपल्या लक्षात आले की, त्या त्या ठिकाणी गटारामध्ये साफसफाई झालेली नाही, रस्ते साफसफाई झाले नाही किंवा मोठे नाले साफसफाई झाले नाही किंवा औषध फवारणी झालेली आहे. अशापद्धतीचे जे रिपोर्ट, जे अहवाल आले ते अहवाल त्यावेळी आले ज्यावेळी ह्या दोन्ही कारणाने म्हणजे स्वच्छता अभियानाची फेरी आणि डेंग्यूचा एक ऋग्ण दगावला, म्हणूनही. त्या कारणाने आल्यानंतर त्यांच्याशी संबंध आला मला वाटते त्यावेळी त्यांना नोटीसा देण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही किंवा तसे काम ह्या प्रशासनाकडून झाले ही नाही की प्रशासनाने असे असलेले प्रभाग अधिकारी किंवा त्यांच्या हाताखाली असलेले प्रभाग अधिकारी किंवा इंजिनिअर्स ह्यांना असे काम सांगण्याबद्दल प्रश्न उद्‌भवला नाही. मला जे सांगायचे आहे त्याचे तात्पर्य आपल्या लक्षात आले का?

**अशोक पाटील :-**

तुमचे तात्पर्य लक्षात आले पण मगाशी डॉ. बावस्कर साहेब ह्यांनी खुलासा केला सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम ह्यांच्या बोलण्यावर की प्रभाग अधिकाऱ्यांनी हे रिपोर्ट दिलेले आहेत मग प्रभाग अधिकाऱ्यांची ती जिम्मेदारी नव्हती का? असे त्यांचे मत त्यांनी प्रदर्शित केले. जर प्रभाग अधिकाऱ्यांनी असा रिपोर्ट दिला नाही व ती त्यांची जिम्मेदारी होती तर त्यांच्या जिम्मेदारीसाठी डॉ. बावस्कर साहेबांनी त्यांना नोटीस किती वेळा बजावली किंवा त्यांना कितीवेळा सूचना दिल्या कारण ते आरोग्य विभागाचे विशेष कार्यकारी अधिकारी आहेत.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, ही जी मोहिम घेण्यात आलेली होती ह्यामध्ये आमचे स्वच्छता निरीक्षक सुद्धा होते. मुख्य स्वच्छता निरीक्षक सुद्धा ह्या टिममध्ये होते. प्रभाग अधिकारी होते, इंजिनिअर्स होते, प्रभाग अधिकारी त्या त्या प्रभागामध्ये सर्व प्रभागाचे कामकाज पाहतात. प्रभाग अधिकारी सर्व विभागाच्या कामकाजाकरिता आहेत, वेळोवेळी ते माझ्याशी संपर्क साधतात, वेळोवेळी ते सूचना करतात,

आमचा वेळोवेळी एकमेकांशी कामाच्या दृष्टीने संपर्क असतो आणि या मोहिमेमध्ये स्वच्छता निरीक्षक असताना, स्वच्छता निरीक्षकांची जबाबदारी नेहमीची साफसफाई करण्याची आहे. ज्यांची साफसफाई करण्याची जबाबदारही आहे त्यांनी जर असे अहवाल दिलेले असतील तर त्याकरिता तेच जबाबदार आहेत.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, आपण त्यांचे रिमार्क्स ऐकून घ्या.

**डॉ. बावस्कर :-**

आणि मी वेळोवेळी विभागामध्ये पाहणी करतो, भेटी देतो. प्रत्येक वेळी प्रत्येक प्रभागामध्ये मला भेट देणे शक्य होत नाही, वेळोवेळी मी मिटींग घेता. स्वच्छता निरीक्षकांची मी आठवड्यातून एकदा तरी सर्वांची सभा घेतो त्यांच्या निर्दशनास आणतो, ठेकेदाराला नोटीसा दिलेल्या आहेत, कालसुद्धा ठेकेदाराला नोटीसा देवून जर एका आठवड्यात तुमच्या कामात सुधारणा झाली नाही तर नियमानुसार तुमचा ठेका रद्द करण्यात येईल, तुमच्यावर कारवाई करण्यात येईल अशाप्रकारच्या नोटीसा सर्वांना दिलेल्या आहेत.

**अशोक पाटील :-**

साहेब, तुम्ही आता नोटीसा देवून त्याचा फायदा होणार नाही आता प्रशासनाने आमच्यापुढे हे रिमार्क्स ठेवलेले आहे की त्यांचा जो ठेका दिला होता त्यात समाधानकारक साफसफाई झालेली नाही म्हणून तुमच्या प्रशासनातर्फे आज हा रिमार्क्स आमच्यासमोर आलेला आहे आणि म्हणून आम्ही निर्णय घेतलेला आहे. हा ठेका रद्द करण्याचा ठराव झालेला आहे आणि तुम्ही त्याला नोटीसा देवून काहीच फायदे होणार नाही. मी तुम्हाला विचारतो, तुम्ही संबंधितांवर काय देखरेख केली?

**डॉ. बावस्कर :-**

संबंधित अधिकाऱ्यांना वेळोवेळी तशा सूचना दिलेल्या आहेत, सभा घेतलेल्या आहेत, विभागामध्ये पाहणी केलेली आहे आणि त्यानुसार ठेकेदारांना नोटीसा दिलेल्या आहेत, स्वच्छता निरीक्षकांना तसे पत्र दिलेले आहे. आज जो निर्णय स्थायी समितीमध्ये घेतला जाईल, त्याला मी काही म्हणत नाही, त्याच्यावर माझे कुठलेही ऑब्जेक्शन नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

जे ठेकेदार आहेत त्यांना तुम्ही कधी नोटीस दिल्यात का?

**डॉ. बावस्कर :-**

नोटीसा काल दिलेल्या आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

काल का दिल्या? म्हणजे स्थायी समितीची सभा लागल्यानंतर तुम्ही नोटीसा देता.

**डॉ. बावस्कर :-**

यापूर्वीही नोटीसा दिलेल्या आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही किती नोटीसा पाठविल्या आहेत ते सभागृहाच्या समोर आणा.

**अशोक पाटील :-**

तुम्ही आता जे वक्तर्व्य केले, आरोग्य निरीक्षक सुद्धा ह्याला जिम्मेदार आहेत तर कोण कोण आरोग्य निरीक्षक आहेत की ज्यांनी आपल्या कामामध्ये कसुरता केलेली आहे. ते तुम्ही सभागृहासमोर आणा.

**मिलन पाटील :-**

डॉक्टर साहेब, वडयाचे तेल वांग्यावर काढू नका, जे प्रभाग अधिकारी आहेत त्या प्रभाग अधिकाऱ्यांना हेच काम आहे. पण तुमचे जे साफसफाई माहिमेचे अधिकारी आहेत जे स्वच्छता निरीक्षक आहेत त्यांना ह्याचे जबाबदार धरा, तुम्ही त्यांना कशाला पकडता की हे अधिकारी जबाबदारी आहेत. वॉर्ड ऑफीसरला जबाबदार धरण्याची ह्याच्यात आवश्यकता नाही. त्या वॉर्ड ऑफिसरांना तुमचे हे एकच काम आहे का? एस.आय. कशाला नेमलेत. आम्ही सांगतो तुम्ही वडाचे तेल वांग्यावर काढू नका. त्यांना आम्ही जबाबदार धरू देणार नाही. धरायचे आहे ते तुमच्याच कर्मचाऱ्यांना पहिल्यांदा जबाबदार धरा.

**डॉ. बावस्कर :-**

प्रभाग अधिकाऱ्यांना आपण अजिबात जबाबदार धरत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

जो प्रभाग अधिकारी आहे त्याला आपण काय अधिकार दिलेले आहेत?

**डॉ. बावस्कर :-**

प्रभाग अधिकारी सर्व विभागाच्या समन्वयाचे काम करतात.

**सुर्यकांत भोईर :-**

कुठल्या विभागाचे, आरोग्य विभाग, बांधकाम विभाग असा कुठला विभाग.

**डॉ. बावस्कर :-**

सर्व विभागाच्या समन्वयाचे काम करतात आणि प्रभाग अधिकारी मला तसे वेळोवेळी फोन करतात आणि मागणी करतात व माहिती घेतात.

**सुर्यकांत भोईर :-**

मागणीप्रमाणे त्यांचे असलेली मागणी तुम्ही पुर्ण करता.

**डॉ. बावस्कर :-**

मागणीप्रमाणे आपण त्यांची मागणी फुलफिल करतो.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रभाग अधिकारी जेव्हा तुमच्याकडे मागणी करतो, त्यावेळी ते जे मागणी करतात त्याचा पुरवठा तुम्ही त्यांना ताबडतोब करता की कधी करता? तो लेखी असता का तोंडी असतो?

**डॉ. बावस्कर :-**

प्रत्येक गोष्ट याठिकाणी लेखी ठेवली जात नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

तोंडी घेण्यापेक्षा आपण लेखी घ्या.

**डॉ. बावस्कर :-**

लेखी घेउ.

**सुर्यकांत भोईर :-**

जेव्हा सभागृहामध्ये हा विषय येतो, तेव्हा तुम्ही ते समोर करा की असा विषय आलेला आहे.

**डॉ. बावस्कर :-**

आता आपण प्रत्येक गोष्ट लेखी ठेवू आणि सगळयांचे लेखी अहवाल जर आपल्याला पाहिजे असतील तर मी प्रत्येक महिन्याला स्थायी समितीच्या सभेमध्ये आपल्यासमोर सादर करेन.

**अशोक पाटील :-**

तुम्ही जे आता आरोग्य अधिका-यांबाबत बोलत होता की, ते आरोग्य अधिका-यांची जिम्मेदारी आहे की त्यांनी आपल्या त्या जबाबदा-या निभावल्या नाहीत, तसा तुमचा आता आरोप आहे ते आपण आमच्यासमोर आणा. आपण त्याचा स्पष्ट खुलासा करा.

**डॉ. बावस्कर :-**

हा माझा आरोप नाही, हा जो अहवाल वाचला त्यावरून दिसते. अहवाल माझ्यापर्यंत अजूनही आलेला नाही, माझ्यापर्यंत अहवाल कोणीही दिलेला नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

जो अहवाल आलेला आहे, तो अहवाल कोणाकडे आलेला आहे? तुमच्याकडे आता संपूर्ण आरोग्स खाते असताना तुमच्याकडे जर हा अहवाल आला नाही तर हा अहवाल कोणाकडे आला? मिरा भाईंदर शहराचे आरोग्य खाते हे संपूर्ण तुमच्याजवळ आहे आणि तुमच्याकडे अहवाल आला नाही ही हसण्यावारी गोष्ट आहे.

**डॉ. बावस्कर :-**

हा जो अहवाल वाचण्यात आला तो अहवाल माझ्यापर्यंत आलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

हे तुम्ही विचारले पाहिजे की, तो अहवाल माझ्यापर्यंत का आला नाही.

**अशोक पाटील :-**

मागच्या सभेत हा विषय वाचण्यात आला आणि मागच्या सभेत ठरवण्यात आले की पुढच्या सभेत हा विषय घेण्यात यावा, विषयपत्रिकेवर.

**सुर्यकांत भोईर :-**

ह्याचा अर्थ परस्पर अधिकारी तुम्हाला डावलतात का?

**अशोक पाटील :-**

मिरा भाईंदर शहराच्या उपायुक्त साहेबांनी हा अहवाल दिलेला आहे, सभेसमोर ठेवलेला आहे.

**डॉ. बावस्कर :-**

ह्याची एक प्रत जर मला मिळाली असती तर.......

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, मी काय बोलतो हे अधिकारी तुम्हाला डावलतात का?

**अशोक पाटील :-**

आणि पेपरमध्ये असे छापून आले आहे की, तुम्ही त्या संबंधित अधिका-यांवर दबाव आणला होता. तुम्ही अधिका-यांना सांगितले की सत्य अहवाल दडपून टाका आणि खोटे अहवाल सादर करा असे आजच्या पेपरमध्ये महाराष्ट्र टाईम्समध्ये आहे.

**डॉ. बावस्कर :-**

सर्वप्रभाग अधिकारी येथे आहेत, कुठल्याही प्रभाग अधिका-याला किंवा कोणालाही मी असे सांगितले नाही आणि हे मी जबाबदारीने बोलतोय. मी खोटं कधीही बोलत नाही, मी हे जबाबदारीने बोलतोय.

**अशोक पाटील :-**

महाराष्ट्र टाईम्स हे जबाबदार वृत्तपत्र आहे आणि ह्या वृत्तपत्रात बातमी छापून आली आहे.

**डॉ. बावस्कर :-**

कोणी काय बातमी छापावी त्याच्यावर माझा कन्ट्रोल नसतो, त्यांनी मी काही बोलू शकत नाही.

**रिटा शाह :-**

महाराष्ट्र टाईम्स बोलले तर लोकल वृत्तपत्र नाही, ते मोठे वृत्तपत्र आहे व प्रशासनाने असे काही केले नाही. तर प्रशासनाने त्यांच्यावर मानहानीचा दावा आणि त्यांना नोटीस बजवायला पाहिजे.

**डॉ. बावस्कर :-**

त्यावर आपल्याला काय ती कारवाई करता येईल.

**रिटा शाह :-**

करता येईल असे नाही तर करायला पाहिजे.

**डॉ. बावस्कर :-**

तशी कारवाई करू या.

**रिटा शाह :-**

त्याच्यावर तुम्ही कारवाई करा.

**डॉ. बावस्कर :-**

सर्व प्रभाग अधिकारी या ठिकाणी आहेत, मी कोणालाही खोटे अहवाल द्या किंवा असे अहवाल देउ नका असे मी कोणालाही सांगितलेले नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही पहिल्यांदा जे ठेकेदार आहेत त्यांच्यावर कंट्रोल ठेवा. जर कंट्रोल ठेवले नाही तर कसे होईल.

**डॉ. बावस्कर :-**

आपण कंट्रोल ठेवले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, कंट्रोलच नाही, तुम्ही अधिका-यांना याबद्दल जबाबदार ठेवू नका ठेकेदार जबाबदार आहेत. जो ठेका ठेकापद्धतीने देता व ठेकेदाराला आपण पेमेन्ट करतो त्याहिशाबाने त्यांच्याकडून काम करून घ्या. तुम्ही का कामे करून घेत नाही.

**डॉ. बावस्कर :-**

जर ठेकेदारांनी काम केले नाही तर ठेकेदार हे जबाबदार आहेतच. ठेकेदारांना कोणीही पाठीशी घालणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

अन्यथा महानगरपालिकेच्या माध्यमातून तुम्ही साफसफाई करा. कशाला तुम्ही ठेके देता.

**डॉ. बावस्कर :-**

आपण कोणीही त्यांना पाठीशी घालणार नाही आणि आपला निर्णय जर ठेके रद्द करण्याचा झाला तर याला आपल्याकडे अत्यंत चांगला पर्याय आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, ठराव झालेला आहे, अनुमोदन झालेले आहे आता आपली चर्चा चालू आहे.

**डॉ. बावस्कर :-**

या ठरावाबद्दल मी काहीच बोलत नाही. ठराव मंजूर करणे हा आपला हक्क आहे.

**अशोक पाटील :-**

आपण यावर पर्याय सूचवा.

**डॉ. बावस्कर :-**

ठराव मंजूर करणे हा आपला हक्क आहे, आपण ठराव मंजूर करा, नियमानुसार त्याची अंमलबजावणी करता येईल. आपल्या हक्काला आम्ही कुठलीही बाधा आणत नाही. जर हे ठेके रद्द करण्यात आले तर अत्यंत चांगला पर्याय जे हैदराबाद महानगरपालिकेने आज ज्याप्रकारे काम चालवलेले आहे तशा प्रकारे आपल्याला आपल्या कामाची रचना करता येईल. त्या कामामध्ये हैदराबाद महानगरपालिकेने महानगरपालिकेचे छोटे छोटे बिटस् तयार केलेले आहेत. आपल्या एका वार्डातून किंवा आपल्या एका प्रभागामध्ये आपल्याला असे तीन चार बिटस् तयार करता येतील. या बिटस्मध्ये आपण त्याचे एस्टीमेट करायचे की पगार किती, हत्यारे किती, गाड्या किती आणि त्यांच्यासाठी लागणारा खर्च आणि तिथले स्थानिक जे कामगार असतील किंवा जे स्थानिक सुशिक्षित बेकार असतील, यांच्याकडूनच असे देकार मागवायचे आणि त्या त्या विभागातील जे स्थानिक बेकार, बेरोजगार सुशिक्षित असतील असे जरी याकामाकरिता पुढे आले, आपल्या प्रभागातून तर अशाच ह्यांना तसे काम द्यायचे आणि त्यांच्यावर आपल्याला विभागव्हाईज नियंत्रण ठेवावे लागेल. त्यासाठी जर आपल्याला सविस्तर माहिती पाहिजे तर मी पुढच्या स्थायी समितीमध्ये हा संपूर्ण पॅर्टन आपल्याला प्रस्ताव रूपाने सादर करतो, त्यावेळी सुद्धा आपण विचार करा. ठेकेदारी चालू ठेवावी किंवा ठेके चालू ठेवावे अशा मताचा मी देखील नाही. आपण जो निर्णय घ्याल, स्थायी समिती जो निर्णय घेईल.

**अशोक पाटील :-**

साहेब, निर्णय झालेला आहे. ठराव झालेला आहे अनुमोदन झालेले आहे. सभापती साहेबांनी फक्त रूलिंग द्यायचे आहे.

**मा. सभापती :-**

ठराव अजून माझ्यापर्यंत आला नाही.

**रिटा शाह :-**

मागच्या सभेत झालेले आहे, ठराव करण्याचा अधिकार नगरसेवकांचा आहे, प्रशासन आमच्या अगोदर लिहून आणायाचे त्याच्यावर मी ऑब्जेक्शन घेतले होते आणि आता मी ठराव मांडलेला आहे. लिहायला वेळ लागते आणि मी ही सभा सोडायच्या अगोदर मी तुमच्याकडे सचिव साहेबांकडे सुर्पुद करते.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

पण त्याला आमची मंजूरी नाही.

**रिटा शाह :-**

तसे तुम्ही सांगा मी तुमचा काही अधिकार घेत नाही.

**मा. सभापती :-**

माझ्याकडे असा ठराव आलाच नाही.

**रिटा शाह :-**

मी लिहून देते ना!

**अशोक पाटील :-**

आपण ठराव पुन्हा मांडा.

**रिटा शाह :-**

मी ठराव मांडलेला आहे की, जो रिपोर्ट जो अहवाल आपल्या समोर सादर झालेला आहे त्या हिशोबाने ठेकेदाराने ऑन दि पेपर फक्त कामे केलेली आहेत पण प्रत्यक्षात काहीच कामे झाली नाही म्हणून तो अहवाल प्रशासनातर्फे आपल्याकडे सादर झालेला आहे. म्हणजे तसले जे ठेकेदार आहेत ज्यांनी मजदूर पुरवणे, औषध फवारणी, नालेसफाई असे ज्या ज्या ठेकेदाराने ठेके घेतले व त्यांच्या विरोधात जो अहवाल आलेला आहे त्या ठेकेदारांना आपण ब्लॅक लिस्टमध्ये टाकून त्यांचे ठेके रद्द करायचे व त्यांना भविष्यामध्ये ठेके द्यायचे नाही असा ठराव मी मांडत आहे, असा ठराव मी मांडलेला आहे. जोजफ घोन्सालवीस ह्यांनी अनुमोदन केलेले आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

या ठरावावर मतदान घ्यावे.

**अशोक पाटील :-**

मतदान करण्यात यावे. माजी सभापती मॉरस रॉड्रीक्स साहेब ह्यांनी या ठरावाच्या विरोधात दुसरा ठराव मांडण्याचे मला वाटते सूचित केले आहे. तुम्ही ठराव मांडा, मग त्याला मतदानाचा अधिकार होईल.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण त्यांना आता नोटीसा बजावल्या आहेत नंतर आपल्याला माहिती मिळेल.

**अशोक पाटील :-**

तुम्ही त्यांना आता कशाला नोटीसा बजावली. आता प्रशासनानेच आपल्या समोर रिप्लाय मांडलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आतापर्यंत मांडण्यात आलेले नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

त्यांनी काय काम केले ते बघायला नका.

**अशोक पाटील :-**

डॉक्टर आता जागे झाले जेव्हा प्रशासनाने आमच्यासमोर रिपोर्ट सादर केल्यानंतर आणि आम्ही खास मागच्या सभेत मागणी केली सभापती साहेबांकडे आणि ह्या विषयपत्रिकेवर हा विषय आणलेला आहे आणि त्यांचे आम्ही अभिनंदनही केले, विषय आणल्याबद्दल व त्या अहवालाच्या कार्यवाहीसाठी ठराव ही मांडलेला आहे, ठराव मांडला आणि त्याला अनुमोदनही झाले आहे.

**रिटा शाह :-**

आम्ही ठराव कोणावर मांडतो, तर ठेकेदारावर, अधिका-यांवर नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

अधिका-यांचा प्रश्न कुठे?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

तुम्ही अधिका-यांच्या अहवालावर कशाला घेता?

**अशोक पाटील :-**

अधिका-यांवर कार्यवाही करणार, ते प्रशासन करणार किंवा सभापती साहेब त्यांच्या अधिकारात त्यांना नोटीसा बजावतील.

**रिटा शाह :-**

मी ठराव आता वाचत आहे आता लिहून झालेले आहे कारण आम्ही हॅन्डराईटींगने लिहितो आमच्याकडे संगणक वगैरे डेस्कवर नाही म्हणून लिहायला वेळ लागते.

(सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी प्रकरण क्र. ११६ च्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**मा. सभापती :-**

आपण कोणकोणत्या ठेकेदाराबाबत बोलत आहात? सर्व ठेकेदाराबाबत बोलता का?

**अशोक पाटील :-**

सगळ्यांचे.

**रिटा शाह :-**

सगळ्यांचे म्हणजे ज्यांच्या विरोधात आपल्याकडे रिपोर्ट सादर झालेला आहे तसे ठेकेदार.

**मा. सभापती :-**

जर तुम्ही एका ठरावाने जर असे ठेके रद्द होत असतील, त्यांचे रिपोर्ट, त्यांचे अहवाल, त्यांची नोटीस असे काही न करता जर आपण ठराव केला आणि जर ठेके रद्द होत असतील आणि त्याला तुम्ही ग्राउंण्ड दिला नाही तर त्याचे ठेके रद्द होतील का?

**रिटा शाह :-**

साहेब, आम्हाला त्याला ग्राउण्ड देण्याची गरज नाही, तुमच्याकडे तसा प्रशासकीयच रिपोर्ट आलेला आहे.

**अशोक पाटील :-**

आपण ह्याच्यावर मार्गदर्शन करा.

**रिटा शाह :-**

साहेब, तुमच्याकडे प्रशासकीय रिपोर्ट सादर झालेला आहे. त्याचा बेस घेवून तुम्ही करा. ॲक्च्युली तुम्हाला अभिनंदन करायला पाहिजे, तुमच्या काळात तुमच्या प्रयत्नाने तुम्ही पत्र वाचून दाखवले त्या हिशोबाने हे सगळे उघडकीस आलेले आहे आणि आता आपण बोलतो की, कुठला बेस

घेउन, आता ते अधिकार तुमचे आहे आम्ही तुम्हाला काम करून दिले आणि ते आता पुढे काय करायचे ते तुम्ही बघा, लिगली कसे बसवायचे.

**मा. सभापती :-**

त्यांनी त्यांच्या काम कामचुकारपणा केला असेल असे एका ठेकेदाराने आणि ते प्रशासनाच्या निर्दशनात आलेले असेल आणि प्रशासनाने त्याच्यावर जी कार्यवाही केलेली असेल, प्रशासनाने त्या पद्धतीच्या नोटीसा दिल्या असतील, त्याचा पूर्ण अहवाल घ्यावा लागेल आणि अहवाल घेतल्यानंतर जी कार्यवाही सन्मा. सदस्यांनी सूचविली, त्या कार्यवाहीस ते पात्र होतील.

**अशोक पाटील :-**

ह्याचा संपूर्ण अहवाल घेउन जसे उपायुक्त साहेबांनी सर्व क्लास टु अधिकारी उतरविले होते आणि ते ह्या लोकांचे रिमार्क्स आहेत. ते रिमार्क्स त्यांनी कमिटीसमोर ठेवले आहे आणि त्यानंतर तुम्ही विषयपत्रिकेवर विषय घेतलेला आहे आणि त्यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत आपण विषय घेतलेला आहे. त्यामुळे हा स्थायी समितीचा अधिकार पोहचतो की जर अशा पद्धतीने ठेकेदाराने काम केलेले नाही आणि प्रशासने तसे आपल्यासमोर सादर करते म्हणजे ही गंभार बाब आहे आणि त्या अनुषंगाने आपण निर्णय घेतलेला आहे आणि ह्याच्यात काही तांत्रिक मुद्दा असेल तर उपायुक्त साहेब किंवा सचिव साहेब ह्याचा खुलासा करतील. या ठरावात जर काही तांत्रिक अडचण असेल तर सचिव साहेबांनी त्याचा खुलासा करावा.

**प्र. सचिव :-**

ठराव मांडणे हा संपूर्ण अधिकार समितीचा आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी जो ठराव दिला आहे त्या ठरावाच्या अनुषंगाने दिलेल्या ठेकेदारांची कामे ही रद्द होऊ शकतात का? कारण ऑलरेडी नियमाप्रमाणे ज्या नोटीस तुम्हांला बजावायला पाहीजे त्या नोटीस बजावल्या आहेत का? त्यांचा विचारण्याचा उद्देश असा आहे की, नियमाप्रमाणे तो ठराव रद्द होऊ शकतो का?

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, माफ करा. तुमचे उत्तर मी देते. कारण तुमच्याकडून जो रिपोर्ट आमच्याकडे सादर झाला त्या चर्चेमधून हा विषय आमच्या डेस्कवर आला आणि त्याच्यावर दिले आहे की, तुम्ही निर्णय द्या. आम्ही निर्णय दिला की, असे मजदूर पुरविणे त्याच्यात काहीतरी ते तुमच्या प्रशासनाने बघायचे आहे की, कुठल्या ठेकेदाराने एवढे मजदूर द्यायचे होते, नाही पुरविणे. ते तुम्हांला शोधायचे आहे. तुमच्या रिपोर्टवरुन आम्ही हा निर्णय दिलेला आहे. आता तुमच्या निर्णयावरुन कुठला ठेकेदार ह्या कॅटेगिरीमध्ये बसतो, त्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाकायचे आहे. तो रिपोर्ट तुम्ही आम्हांला परत द्या.

**प्र. सचिव :-**

हा जो रिपोर्ट आहे तो प्रशासनाचा रिपोर्ट आहे. सचिवांचा ह्याच्याशी काही संबंध येणार नाही. त्याला प्रशासन उत्तर देईल.

**अशोक पाटील :-**

प्रशासनातर्फे उपायुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**प्रभात पाटील :-**

आपण शेवटी ठेका देतांना, शेवटचा क्लॉज असतो त्यांच्यात की, सदर निविदा रद्द करण्याचा किंवा काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवलेलाच असतो ना? शेवटी हा समितीचा निर्णय आहे आणि तसा निर्णय त्या ॲग्रीमेंटमध्ये लिहिलेला असतो.

**अशोक पाटील :-**

आम्ही कोणावर आकस ठेवून निर्णय घेतलेला नाही. प्रशासनाचे जे रिमार्कस् आलेले आहेत, त्या रिमार्कस्वर गांभिर्याने चर्चा करुनच आम्ही निर्णय घेतलेला आहे. आम्ही कुठच्या ठेकेदारासंदर्भात किंवा अधिकाऱ्यांच्या संदर्भात आकस दाखविला नाही. जी वस्तुस्थिती आमच्यासमोर मांडली त्याच्यावर आम्ही निर्णय घेतलेला आहे. सन्मा. सदस्या रिटाजी शाह यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्याला अनुमोदन म्हणून मी जाहिर करतो. ज्याअर्थी निविदा मंजुर करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत, तर तसे नामंजुर करण्याचे अधिकार ही स्थायी समितीला आहेत. उपायुक्त साहेब बरोबर आहे ना! तुम्हीही प्रशासनाच्या वतीने ह्याच्यावर खुलासा करा.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय. कोणतीही कार्यवाही जर करायची असेल ती कर्मचाऱ्यांच्या संबंधात असेल किंवा ठेकेदाराच्या संबंधातील असेल त्यासाठी एक कायदेशीर प्रोसिजर

असते. त्यामध्ये नोटीस देणे असते किंवा इतर त्यांचे खुलासे असतात, नैसर्गिक न्याय व कायदेशीर मुद्दे असतात. त्या दृष्टीने आपल्याला हे करणे आवश्यक असते. ती प्रोसीजर पुर्ण झाल्यानंतरच व जरी आपली स्थायी समिती मंजुरी देणारी ऑथोरिटी असली तरी ही संपूर्ण प्रोसिजर झाल्यानंतरच त्यावर निर्णय घेऊ शकतो.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, आपण ह्याच्यावर रुलिंग द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे नालेसफाईचे उत्तर मिळालेले नाही. त्या ठेकेदाराचे नांव मला अजूनपर्यंत सांगितलेले नाही. नालेसफाई न करता त्याला तुम्ही परस्पर पेमेन्ट करता. त्या ठेकेदाराच्या नावांची माहिती मिळाली तर बरे होईल.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर ह्यांनी जो प्रश्न विचारला होता की, जे कच्चे नाले किंवा मोठा जो नाला आहे, तर आमच्याकडे नालेसफाई छोट्या नाल्यांची झाली. परंतु, संपुर्ण प्रभाग क्र. ११ मधून जाणारा नाला तो संपूर्ण ११ व १२, तो नाला घोडबंदर येथे मिळतो. तो नाला मला असे वाटते प्रत्येक वर्षी नालसफाई होतांना तो नाला अजूनपर्यंत साफ झालेला नाही. घोडबंदरचा नाला म्हणजे विठ्ठल मंदिराकडे जाणारा नाला आणि हा नाला अर्धवट साफ केल्यानंतरसुद्धा ठेकेदाराला त्याचे पुर्ण पैसे मिळतात असे मला वाटते. कारण प्रत्येक वर्षी नवीन टेंडर निघते आणि तो नाला काही साफ होत नाही. तसाच माझा दुसरा प्रश्न आहे की, आमच्या प्रभागामध्ये औषधांची फार कमतरता आहे, औषधे वेळेवर मिळत नाही. डॉक्टर साहेब, हे चुकीचे आहे. कारण आम्ही ज्यावेळी सांगतो त्याचवेळी औषध पाठवता. तेथील जे एस.आय. आहेत त्यांना विचारले की, औषध का नाही आहे? ते सांगतात, साहेब औषध आता येणार आहेत. सन्मा. सदस्य घोन्सालवीस साहेबांनी अगोदर जो प्रश्न उपस्थित केला, तो प्रश्न योग्य आहे. कारण प्रत्येक वेळी सभापती महोदय, मी औषधांच्या संदर्भात बोलतोय. कारण घोन्सालवीस साहेबांनी जो आरोप केला तोच आरोप माझासुद्धा आहे. कारण ज्या वेळेला सॅनेटरी इन्स्पेक्टरला सांगितले की, ते जे कामगार असतांना त्यांना विचारले की, साहेब औषध नाही तर सॅनेटरी इन्स्पेक्टर बोलतो की, साहेब हे औषध येणार आहे. आपण डॉक्टर साहेबांना विचारले की, औषधाचे काय झाले? तर ते सांगतात की, आता पाठवून देतो. असे हे प्रकार आहेत. तसेच धुरासाठी जे पंप घेतलेले आहेत त्यासाठी ज्यावेळेला आम्ही मागणी करतो, महिन्यातून, दोन महिन्यातून प्रत्यक्षात असे कधीही काम होत नाही की, न सांगता कुठले ही काम आजपर्यंत झालेले आहे. ह्या संदर्भात औषध वेळेवर पुरवली गेली पाहिजे. आपल्या महापालिकेमार्फत एवढी औषधे खरेदी केली जातात. त्याचा योग्य वापर होत नाही असा हा प्रकार आहे. २० हजार लिटर औषधाची जी खरेदी केली, त्या औषधांचा संपूर्ण वापर झाला का?

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, आता हे जे स्थायी समितीमध्ये ठेका पद्धती, ठेका रद्द करण्याचा जो ठराव मांडलेला आहे.

**अशोक पाटील :-**

रद्द केला.

**सुर्यकांत भोईर :-**

तो ठेका रद्द झालेला आहे.

**रिटा शाह :-**

त्याच्यावर मिलन पाटील ह्यांनी सुचना दिलेली आहे की, ठेका पद्धती रद्द करा.

**मिलन पाटील :-**

मी ह्याचे बोललो नाही, ह्याच्या पुढील जे द्यायचे आहेत त्यांचा आपण विचार करा.

**सुर्यकांत भोईर :-**

विधी सल्लागार साहेब, आपण ह्याची ठेका पद्धत रद्द केल्यानंतर ते कोर्टात जाणार नाही का? मग त्याच्या अगोदर आपण स्टे घ्या.

**बी. एम. माळी :-**

सर्व अधिकार प्रशासनाचे आहेत. कोर्टात जाण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. ह्या विषयी कोर्टातर्फे काय कार्यवाही करायची ती प्रशासनाने करायची आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, स्थायी समितीमध्ये आता ठराव झालेला आहे की, ठेका पद्धती रद्द करण्यांत यावी हे संपूर्ण ठेकेदार जर कोर्टात गेले तर त्यांचा कोर्ट निर्णय काय होईल.

**एस्. एस्. साळवे (विधी सल्लागार) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने आणि सन्मा. सदस्यांच्या परवानगीने बोलतोय, या ठिकाणी हा जो ठराव आणलेला आहे. हा कोर्टात चॅलेंज होऊन आपल्या विरुद्ध जाऊ शकतो.

**सुर्यकांत भोईर :-**

तसेच ते कॅव्हीट दाखल करतील ना?

**एस्. एस्. साळवे (विधी सल्लागार) :-**

कारण मला असे सांगायचे आहे की, त्या ठेकेदाराचा ठेका कॅन्सल करण्याच्या अगोदर त्यांना शोकॉज नोटीस द्यायला पाहिजे. त्यांचे म्हणणे ऐकायला पाहिजे आणि ते म्हणणे समाधानकारक नाही, असे म्हणून तो ठराव पुन्हा या समितीकडे यायला पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

ॲग्रीमेंटच्या अटीशर्ती काय आहेत?

**एस्. एस्. साळवे (विधी सल्लागार) :-**

ॲग्रीमेंटच्या शर्ती ह्याच आहेत की, ज्या माणसाचे आपण ठेका रद्द करतो, कॉन्ट्रॅक्ट ॲक्टप्रमाणे त्याला शोकॉज नोटीस द्यायला पाहिजे. त्याचे म्हणणे ऐकायला पाहिजे. लेखी किंवा तोंडी त्याचे म्हणणे ऐकल्याशिवाय त्याच्यावर निर्णय घेता येणार नाही आणि तो निर्णय ॲडमिनिस्ट्रेशनने घेतल्यानंतर तो ठराव या समितीपुढे यायला पाहिजे आणि तो ठराव समितीने मंजुर करायला पाहिजे. म्हणजे, दॅट विल बी ए लिगल कॅन्सलेशन.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण जे बोललात ते आम्हांला मान्य आहे. मलाही थोडेफार लिगली ज्ञान आहे की, तशा प्रकारचा ठराव यायला पाहिजे. पण जेव्हा केव्हा आम्ही प्रशासनाकडे तक्रार केली की, अमुक अमुक ठेकेदाराचे काम व्यवस्थित नाही आणि तुम्ही त्याची चौकशी करा आणि आमच्याकडे रिपोर्ट सादर करा. पण असे नाही. आम्ही काहीच केले नाही. प्रशासनाने ते ठेकेदार काम व्यवस्थित करत नाही अशा प्रकारे विभागप्रमुखांनी स्वतः रिपोर्ट सादर केलेला आहे.

**एस्. एस्. साळवे (विधी सल्लागार) :-**

तुमची जी अडचण आहे त्या अडचणीशी मी सहमत आहे. परंतु, मला असे सांगायचे आहे की, कोर्टाची प्रोसिडींग करतांना त्यात अडचण येऊ नये म्हणून मी सांगितले. कारण ही ॲक्शन प्री-मॅचुअर्ड ॲक्शन होईल आणि त्याने जर केस केली तर ती आपल्या विरोधात जाईल.

**रिटा शाह :-**

आम्ही तुम्हांला ॲडमिनिस्ट्रेशनला ठराव करुन दिला. आता पुढचे प्रोसीजर तुमचे आहे. तुम्ही काय करायचे? त्यांचा रिपोर्ट तुमच्याकडे आहे.

**प्रभात पाटील :-**

नाही तरी, आपल्या पालिकेला कोर्टात जाऊन हारण्याची पुरानी आदत आहे. त्याच्यामुळे हेही केसदेखील हारु, काय फरक पडतोय? आम्ही विधी सल्लागार आणि कायदेपंडित तेवढ्यासाठीच नेमलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

हारण्यासाठी नेमलेले आहेत.

**प्रभात पाटील :-**

केस हारण्यासाठीच नेमलेले आहेत. कोणती केस नगरपालिकेने जिंकली आहे? ते आपण मला सांगावे.

**मिलन पाटील :-**

विधी सल्लागार साहेब, हा तुमच्यावर आक्षेप आहे. तुम्ही सांगा आपण कुठली केस जिंकली पाहिजे?

**एस्. एस्. साळवे (विधी सल्लागार) :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, आपण ह्या कॉर्पोरेशनच्या बऱ्याचशा केसेस आपण जिंकलेल्या आहेत. त्याची यादी पाहिजे असल्यास त्याची यादी आपल्याला देऊ शकतो.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण ते सभागृहासमोर सादर करा.

**एस्. एस्. साळवे (विधी सल्लागार) :-**

आता ताबडतोब तर शक्य नाही. कारण तसा विषय नव्हता.

**सुर्यकांत भोईर :-**

पुढच्या सभेत आपण ते ठेवा.

**एस्. एस्. साळवे (विधी सल्लागार) :-**

ठिक आहे. देऊ शकतो.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, विधी सल्लागार आणि उपायुक्त ह्यांनी आपल्याला तांत्रिक बाबींबद्दल थोडासा खुलासा केला. त्याबद्दल आम्ही ठरावामध्ये थोडासा बदल सुचवितो. ठराव रद्द करत नाही, ठरावामध्ये तांत्रिक सल्ला जो आम्हांला दिला त्या तांत्रिक सल्ल्यानुसार आम्ही असा बदल सुचवितो की, ह्या ठेकेदाराने जो कामचुकारपणा केलेला आहे की, ह्या ठेकेदारांना या तीन महिन्यामध्ये त्यांनी आपल्या कामाची जी प्रगती दाखविली नाही, त्याबद्दल प्रशासनानेच आमच्याजवळ जे रिमार्कस् ठेवलेले आहेत ते भयानक रिमार्क वाचता आम्ही या ठेकेदारांना हा ठेका रद्द करण्यासंदर्भाबाबत ठराव केलेला आहे. विधी सल्लागार व उपायुक्त साहेबांच्या तांत्रिक बाबींच्या सुचनेवरुन त्याच्यावरुन आम्ही सुचना अशी सुचवितो की, जी काही कायदेशीर प्रोव्हिजन करायची असेल, ठेकेदारांना शोकॉज नोटीस देऊन त्यांचे खुलासे मागवून, ती संपूर्ण प्रक्रिया पुर्ण करुन या ठेकेदारांचे ठेके रद्द करण्यांत यावे असे मी या ठरावामध्ये बदल सुचवितो.

**रिटा शाह :-**

माझ्या ठरावात हे इन्क्लुड करुन घ्यावे, अशी मी मंजुरी देत आहे.

**मा. सभापती :-**

ठराव आम्ही अजून स्विकारलेला नाही. सचिवजी जेव्हा मी ठराव घेईन तेव्हाच तुम्ही ती दुरुस्ती घ्याल ना? आणि सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्सजी ह्यांनी या ठरावावर आक्षेप घेतलेला आहे. त्यामुळे हा ठराव मी स्विकारलेला नाही. ठराव स्विकारल्यानंतर दुरुस्ती सुचविण्यांत येईल.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ११६ वर सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी जो ठराव दिलेला होता त्याला अशोक पाटील ह्यांनी अनुमोदन दिले होते.

**अशोक पाटील :-**

काय झाले?

**मा. सभापती :-**

त्यांना पाच मिनिटे मी थांबवले आहे.

**रिटा शाह :-**

एकदा वाचतात, मग परत थांबवतात. असे काय चालले आहे?

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा १५ मिनिटांकरिता तहकुब झाल्याचे जाहिर करीत आहे.

**सभा तहकुब केल्याची वेळ :- दुपारी ०१.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**